# गड आणि कोट

## प्र. के. घाणेकर

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वी
दा. क्र. २८६५



BVBK-0402865

गो. वा.
२८६५
२६।११।८३

# गड आणि कोट

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. २८६५ दिनांक २६।११।८३
विषय गो. वा. क्र. ..........

प्र. के. घाणेकर

— प्रकाशक —

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह.

BVBK-0402865

स्नेहल - १०६

प्रकाशिका-मुद्रक
सौ. अंजली रवीन्द्र घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
३६ ब, गुरूदत्त सहवास, दक्षिणामुखी मारुतीजवळ,
४७०/४९८ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन : ४५ २९ ११.

मुखपृष्ठ पारदर्शिका
प्र. के. घाणेकर

मुखपृष्ठ सजावट
श्री. अनिल उपळेकर

प्रथम आवृत्ती - ऑगस्ट १९९३.

मुद्रणालय
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

टाईपसेटिंग
प्रकाश एन्टरप्रायझेज
५/१५, 'अर्चना' बिल्डींग,
हॉटले स्वीकारजवळ, एरंडवणा,
पुणे ४११ ०३०.
फोन : ४३ ८३ ७३.

मूल्य : ३५ रूपये.

गड आणि कोट

# मनोगत

किल्ले म्हणजे महाराष्ट्राचे वैभव. भुईकोट, डोंगरी किल्ले, पाणकोट आदिंच्या जिवावर श्रीशिवछत्रपतींनी इथे देशी हिंदवी स्वराज्य उभारले. अलिकडेच 'ट्रेकिंग'च्या छंदामुळे अनेकजण या गटकोट किल्ले अन् दुर्गांवर जातात. पण तिथे कसे जावे? काय पहावे? हे सारे माहिती नसते. त्यामुळे या किल्ल्यांच्या सहलींमधून दमण्याखेरीज फारसे काही हाती लागत नाही.

मागे मी 'साद सह्याद्रीची, भटकंती किल्ल्यांची' असं सुमारे शंभर किल्ल्यांची माहिती देणारे पुस्तक लिहिले. त्याच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. आता तर त्याचे इंग्लिश भाषांतरही प्रसिद्ध होत आहे. पण त्या पुस्तकाची किंमत आणि आकार विचारात घेतला, तर ट्रेकवर ते बरोबर वागवणे शक्य होत नाही. म्हणूनच त्याचे सोयीस्कर असे सहा भाग पाडून ते प्रसिद्ध करावेत अशी मागणी अनेक वाचकांनी अन् दुर्गप्रेमींनी केली. त्याचाच परिपाक म्हणजे हा सहा पुस्तकांचा संच. किंमत अन् आकारमान लक्षात घेतलं तर ही पुस्तकं ट्रेकवर जाताना- गड किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट देताना बरोबर नेणे अन् वागवणे सोयीचे ठरावे.

दुर्गप्रेमी वाचक त्यांचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**– प्र. के. घाणेकर.**
**१०५, नारायण पेठ,**
**पुणे – ४११ ०३०.**

# अनुक्रमणिका


१. अलंगगड-कुलंगगड-मदनगड ५
२. शैल कळसूबाई ११
३. कांचन १४
४. त्र्यंबकगड ऊर्फ श्रीगड १८
५. देवगिरी १९
६. धोडप २५
७. रतनगड २८
८. वसई ३२
९. साल्हेर आणि सालोटा ३६
१०. तुंग ऊर्फ कठीणगड आणि तिकोना ऊर्फ वितंडगड ४२
११. कुर्डू ऊर्फ विश्रामगड ४६
१२. कोकणदिवा ५०
१३. कोतळीगड ऊर्फ पेठचा किल्ला ५३
१४. कोरीगड ऊर्फ शहागड आणि घनगड ५५
१५. ढाकचा किल्ला ६१
१६. बहाद्दूरगड ऊर्फ पेडगावचा किल्ला ६४
१७. लोहगड ६८

म. सं. सं. डार्गे, वाचनालय शाखा.
बाल साहित्य विभाग
दा. क्र २८६५ दिनांक २६/११/८३
विषय बा.वा. क्र. . . . . . . .



# १. किल्ले अलंगगड, कुलंगगड आणि मदनगड : (जि. नाशिक)

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीच्या दक्षिणेस १०-१२ कि.मी. वर पसरलेल्या कळसूबाईच्या रांगेत दीड हजार मीटर उंचीपेक्षा जास्त उंचीचे तीन किल्ल्यांचे एक त्रिकूट त्रिशूळासारखे आकाशात झेपावले आहे. नगर आणि नाशिकच्या बरोबर सीमारेषेवरचे हे दुर्ग बुलंद आहेत, बेलाग आहेत अन् तितकेच उपेक्षितही आहेत. त्यावरील गुहा, तेथील टाकी इ. वरून ते फार फार प्राचीन असावेत. शिवराज्याचा विस्तार या बाजूला विशेषसा न झाल्याने प्राचीन कालखंडाप्रमाणेच शिवयुगाबाबतही ते मुग्धच आहेत. त्यांना वाचा फुटली, ती इ.स. १८१८ मध्ये शेवटच्या इंग्रज-मराठे युद्धात ! आणि तीच शेवटची. तेथे जाण्याचे मार्ग आधीच नामी. तीन-चारशे मीटर उंचीच्या कड्याला बिलगून जाणाऱ्या या बिकट वाटांपर्यंत जाणारा मार्ग उभ्या कड्यात खोदलेल्या पायऱ्यांचा आणि इ.स. १८१८ त कर्नल मॅकडॉवेलने आपल्या अधिकाऱ्यांच्या सहाय्याने त्या पायऱ्यांवर तोफा डागून, तेथे सुरुंग पेरून त्या मुळातच नष्ट करून टाकल्या. त्यासाठी पेरलेल्या सुरूंगाच्या खुणा आजही जागोजागी आढळतात. तर या किल्ल्यांचे उल्लेख ते जिंकून निकामी केल्याचेच आढंळतात.

आमचे आठजणांचे टोळके भंडारदऱ्याभोवती कोंदणासारख्या पसरलेल्या ह्या दुर्गरत्नांचे दर्शन घ्यायला सिद्ध झाले. भर दुपारी आम्ही रतनगड सोडला आणि त्रिंबक दरवाज्यानं साम्रत गावाकडे कूच केले. तेथे जाईपर्यंत दिवस कलला होता, सावल्या लांबल्या होत्या. पाखरं घरट्यांकडे अन् गायी गोठ्यांकडे परतत होत्या. आमची पावलं जरी साम्रतच्या लक्ष्मणराव बांड्यांच्या घराकडे वळली होती, तरी मने मात्र सामोऱ्या उभ्या ठाकलेल्या ह्या

दुर्गत्रिकुटाकडेच धावत होती.

**हा कसला उपदेश ?**

लक्ष्मणरावांनी आमच्या अवजड बोज्यांकडे अन् साथीला असणाऱ्या उषा, हेमाकडं पाहिलं अन् चक्चक् करीत ते उद्गारले,''बाळांनो, हे वेडं साहस करू नका ! आता हे किल्ले वहिवाटीतले राहिले नाहीत. इथे राहून माझे केस पिकले, पण मीही अजून तेथे गेलो नाही, आणि तुम्ही तर शहरगावची माणसं! तिथे जाणे तुम्हाला जमणार नाही. हं, आता आलाच आहात तर कळसूबाईच्या दर्शनाला जा अन् गुमान घरी जा कसं !''

आम्ही अन्नब्रह्माची साधना करीत होतो अन् हा उपदेश ऐकत होतो. या कानाने ऐकलेले त्या कानाने सोडून देत होतो.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून बाडबिस्तरा आवरून आमचे, दुर्गपुत्र अन् कन्यकांचे टोळके घाटघरची वाट तुडवू लागले. एक दांड पार करताच अलंग-मदन-कुलंगचे बेलागकडे अन् पाताळस्पर्शी दऱ्या दिसू लागल्या. मन उचंबळून आले होते. घाटघरच्या नवीन वाडीत पोटपूजा आवरली अन् पाणी भरून घेतले. न जाणो वाट सापडली नाही, तर जंगलथैलीतले पाणी तरी मिळेल. पावलापावलाने अलंगगड जवळ करू लागलो तो त्याचा माथा लांब लांब जात असल्याचा भास होऊ लागला आणि अखेर आम्ही अलंगगडाच्या अक्राळविक्राळ कातळकड्याच्या पायथ्याशी पोहोचलो. हा कडा चढणे जमेल का? काही भलते सलते तर होणार नाही ना? या शंका जरी मनात आल्या तरी बोलून कोणीच दाखविल्या नाहीत. अलंगच्या उजव्या हातास एक सुळका आहे. तेथून डावीकडे असणाऱ्या कड्यावरील बरोबर तिसऱ्या घळीतून वाट आहे. ही खूणगाठ मनाशी होतीच. प्रस्तरारोहण करीत तेथपर्यंत गेलो अन् वाट सापडली.

**बोराएवढे टपोरे थेंब.**

वाट कसली? ऐन कपारीत एक लुटूलुटू हलणारी खोडाची मोळी गुंतवली आहे. तिच्या डोलण्याकडे लक्ष न देता सरळ वर चढायचं म्हणजे उरल्यासुरल्या पावठ्या ध्यानी येतात.

आमच्यापैकी चार-दोनजण त्या पावठ्याशी पोहोचतात न पोहोचतात तोच आकाशातून बोराऐवढे टपोरे थेंब खाली येऊ लागले. आधीच कामातून गेलेल्या पायऱ्या निसरड्या झाल्या अन् पुढची प्रगती अधिकच भयप्रद झाली. आम्ही पितृतुल्य सह्याद्रिची अन् वरूण राजाची प्रार्थना केली. ती बहुधा त्या दुर्गपुरूषाने त्यांच्या कानी पोहोचवली असावी कारण १०-१५ मिनिटांतच हे संकट नाहीसे झाले.

नाहीतरी ह्या दुर्गपुरूषाला भेटायला कोणी जात असेल? आम्ही ह्या गडकोट अन् दुर्गांवर जर मनापासून प्रेम करतो तर ह्या उत्कटतेला तशी दाद मिळणारच ! गेल्या दोन-तीन हजार वर्षांचा हा प्राचीन दुर्गपुरूष मोठा प्रेमळ आहे, पण अंतरीची ओढ असल्याखेरीज त्याच्याजवळ जाताच येत नाही.

आम्ही वर गेलेल्या मंडळींनी बाकीच्यांच्या जंगलथैल्या अन् खाली जमा केलेलं जळण दरवाजात ठेवून दिलं होतं, ते तेथील विघ्नहर्त्या गणेशाच्या कोरीव मूर्तीवर हवाला ठेवून ! आता वाट त्या दरवाजातून जात नाही. मोठमोठे प्रस्तरखंड त्या वाटेवर मांडा ठोकून बसले आहेत अन् दरवाजा साफ बंद झाला आहे. पण महाद्वाराची रेखीव चौकट मात्र अजून शाबूत आहे. तसंच थोडं उजव्या हातास प्रस्तरारोहणाची मदत घेऊन वर गेलं की, दरवाजाच्या माथ्यावर जाता येतं समोरच एक गुहा दिसली व एक कोरडं टाकं.

आता पाऊस जरी थांबला होता तरी खडक वाळले नव्हते. तरीही डावीकडची वाट आम्ही चालू लागलो. खाली काही शे

मीटर तुटलेला कडा, वर उजव्या हाताला उभा कडा अन् मधूनच पाऊलभर रुंदीची ही मुरमाड घसरडी अन् निसरडी वाट म्हणजे एक जीवघेणं साहसच होतं. जवळजवळ तास-सव्वा तासानं आम्ही ह्या अर्धा कि.मी. वाटेच्या टोकाशी आलो अन् सुटकेचा नि:श्वास सोडला.

उभ्या कातळात खोदलेल्या गुहा खुणावत होत्या. निर्मळ जलाने तुडुंब भरलेली टाकी साद घालीत होती अन् त्या मळभट वातावरणातदेखील भन्नाट वारा मोठा सुखावत होता. संगती नेलेले तहानलाडू अन् भूकलाडू पोटात भरले अन् दुर्गदर्शनास निघालो. अजून गडाचा माथा वरच होता. तेथे पोहोचलो तो एका प्रचंड इमारतीचे अवशेष मोठ्या दिमाखाने अजूनही ताठ उभे होते. दहा टाक्यांचं कोंडाळं मोठं लोभसवाणं होतं. गाडाच्या माथ्यावर पोहोचलो तो आकाश चांगलंच निवळले होते. पश्चिमेकडे आवंढा, पट्टा (विश्रामगड) अन् चितनगड, तर उत्तरेकडे हरीष, त्रिंबक, अंजनेरी आणि पूर्वेकडे सिंधगड, भीमाशंकरचे पठार लक्ष वेधून घेत होते. पश्चिमेला आमचे परवाचे सोबती मदनगड अन् कुलंगगड मोठ्या कवतिकानं माना उंचावून या अनपेक्षित अन् अगंतुक पाहुण्यांकडे पहात होते. दुसऱ्या दिवशीच्या जलविहाराच्या योजना मनात आखतआखतच खाली उतरलो. त्या उबदार गुहांच्या पोटात झोप केव्हा लागली हे कळलेच नाही. त्या भयाण, एकाकी, निर्जन दुर्गावरदेखील इटुकल्या मिटुकल्या चांदण्या आमच्यावर पहारा देत रात्रभर जाग्या होत्या.

भल्या पहाटे जागे झालो ते बापूंच्या हाकेने. पूर्वेला चांगलच फटफटलं होतं, तांबडं फुटलं होतं अन् रवीराजाचं दर्शन मोठं प्रसन्न होतं. आजच्या चांगल्या हवामानाची ती जणू निशाणीच होती.

मोठ्या आनंदात दहा टाक्यांमध्ये पोहायला गेलो. मनसोक्त

जलक्रीडेनंतर पुन्हा एकदा पोटभर दुर्गदर्शन घेतले अन् सूर्य डोक्यावर आल्यावर गड सोडला. परत ती जीवघेणी वाटचाल करून मोळीवरून खाली उतरलो. आता वाटचाल सुरू झाली ती मदनाकडे !

अलंग अन् मदन विभागले आहेत एका जेमतेम शंभर-दीडशे मीटर रुंद अन् पन्नास-पाऊणशे मीटर खोल दरीने. पण त्यामुळे अलंग संपूर्ण उतरून त्या दरीत चढून जावे लागते अन् मग मदनाचा संपूर्ण चढ चढावा लागतो. खिंडीतून डाव्या हाताची ट्रॅव्हर्सी (डोंगरावरील समपातळीवरील आडवी डोंगरवाट) जवळ केली अन् अतिअरुंद अशा पायऱ्या लागल्या. डावीकडे कडा अन् उजवीकडे दरी अशा वाटेने गेल्यावर त्या दीड-दोनशे पायऱ्यांच्या शेवटी सामोरा आला तो चांगला १२-१५ मीटर उंचीचा निव्वळ पाषाणाचा उभा कडा. तिथल्या प्राचीन पायऱ्यांना सद्‌गती मिळाली ती इ.स. १८१८ मध्ये आणि आमच्यासारख्या दुर्गवेड्यांना एक आव्हान प्राप्त झाले. विजयनं १०-१५ मिनिटांत तो अवघड कडा मोठ्या लीलयेने पार केला अन् वरून दोर खाली सोडला. आता मात्र अंधार दाटू लागला. मोठ्या निकराने आम्ही आणि आमच्या जंगल-थैल्या कड्याच्या माथ्यावर आलो अन् अंधार गुडूप झाला. मदनाचा कातळकडा डावीकडे अन् कातळमाथा उजवीकडे ठेवून त्या भयाण अंधारातून ट्रॅव्हर्सी पार केली आणि भंगलेल्या पायऱ्यांच्या जिन्याशी आलो. अंधारामुळे खालच्या दऱ्या दिसत नव्हत्या, म्हणून बॅटरीच्या उजेडात आरामात वर गेलो. ते अवघड साहस दुसऱ्या दिवशी दिवसा-उजेडी पाहिलं अन् मनात म्हटले, धन्य आहे !

मदनावर दोन गुहा आहेत. एक खाली पायऱ्यांजवळ अन् दुसरी थेट माथ्याजवळ. वरची गुहा प्रशस्त अन् पाण्याजवळ म्हणून तेथेच पथाऱ्या पसरल्या. मी अन् हेमाने झक्कपैकी साखरभात

केला अन् त्याचा सुखास्वाद घेऊन शांत झोपी गेलो.

**वाटच हरवली.**

कोंबडसादी उठलो. दुर्गदर्शनास निघालो. गडाला पोषक अन् अत्यावश्यक अशी कोणतीही लक्षणे या तिन्ही किल्ल्यांवर क्वचितच दृष्टीस पडतात. तट, बुरुज, दरवाजे, बालेकिल्ला, एखाददुसरं मंदिर, तोफा यातलं क्वचित काही, एखाददुसरं नजरेस पडतं. कारण बाकी सारं बुद्ध्याच नष्ट केलं गेलं आहे. खोदीव पायऱ्या, गुहा अन् पाण्याची टाकी हीच काय ती प्रकर्षानं मनात भरतात.

दवभरल्या गवत अन् खडकामुळे मदनाच्या नेढ्यावर जाण्याचा प्रयत्न सोडून देऊन गुमान खाली उतरू लागलो. आता दिवसाढवळ्या समोरची दरी अन् कडे जास्तच भीषण वाटत होते. तरीही उतरणे प्राप्तच होते.

अलंग-मदनच्या खिंडीत येऊन डोंगर उतरणीला लागलो, पण ओढ्यातील प्रचंड प्रस्तर अन् आजूबाजूच्या कारवीत वाटच हरवून बसलो आणि खूप खालीही आलो. अखेर अंधार पडायच्या बेतात आम्हाला कुलंगगडाची बरोबर वाट सापडली, पण ती खूपच दमणूक करणारी निघाली. साऱ्यांच्या जिभा वारंवार सुकलेल्या साफ ओठांवरून फिरू लागल्या. तोंडातली लाळ चिकट झाली अन् तहानेने घसा साफ कोरडा झाला. नको ते गड पाहणे असे वाटू लागले, पण अखेरीस जिद्दीने या जीवघेण्या चढणीवरून वर गेलो व कुलंगगडाच्या टाक्यांतील थंडगार पाणी पिऊन ताजेतवाने झालो.

आता आमचं लक्ष होतं कळसूबाई - महाराष्ट्राचं एव्हरेस्ट! उण्यापुऱ्या १६४६ मीटर उंचीचं ते शिखर म्हणजे महाराष्ट्राचा सर्वोच्च बिंदू ! ऐन रात्री वारी गावात मुक्काम टाकला. भल्या पहाटे साडेपाच वाजता कळसूबाईकडे कूच केले आणि साडेआठ

वाजता शिखरावर पोहोचलो देखील. रतन-अलंग-मदन-कुलंग ह्या आमच्या दुर्गमित्रांकडे प्रेमाने नजर टाकली. ते सोनेरी क्षण आता या जन्मी विसरणे शक्य नाही.

कळसूबाईच्या शिखरावरून उतरताना गेल्या चार दिवसांतल्या आठवणी उफाळून येत होत्या. त्या गडांचे अन् आमचे नाते जडले आहे. परत जात होतो ते पुन्हा परत येण्यासाठी.


## २. शैल कळसूबाई : (जि. नगर)

कळसूबाई म्हणजे महाराष्ट्राचं एव्हरेस्ट !

महाराष्ट्रातील सह्याद्रिचं हे सर्वोच्च शिखर. इथं जायचं तर चार दिवस सवड काढून जाणं उत्तम. कारण भंडारदरा धरणाचा रम्य परिसर, तिथले रतनवाडीचे अमृतेश्वर महादेवाचे मंदिर, रतनगड किल्ला, रंधा धबधबा, पाबर किल्ला, अलंगगड - मदनगड - कुलंगगड हे दुर्गत्रिकुट, आवंढा, पट्टा ऊर्फ विश्रामगड आणि बितनगड ही दुर्गत्रयी असे बरेच काही पाहण्यासारखे आहे. पण तिथे फक्त पायगाडीवर स्वार होऊनच जाता येते. विनोबा एक्सप्रेसला ही सारी स्टेशने घेता येतात. १६४६ मीटर उंचीचे हे शिखर तिथं असणाऱ्या बारी या इगतपुरी-भंडारदरा रस्त्यावरून जायला खूप सोयीचे पडते. ते गाव शिखराच्या पूर्वेस आहे. अदमासे नऊशे मीटरची अनेक टप्प्यांची चढाई त्यासाठी करावी लागते.

कळसूबाईवर जायला जरा लांबून दक्षिणेकडून जाणारी गुरांची वाट, पूर्वेकडून नेहमीची साखळदंडाची वाट आणि त्याच बाजूने पण फारशी परिचित नसलेली गोटीची वाट तसेच शिखराच्या उत्तरेकडून इंदोर गावातून येणारी वाट अशा अनेक वाटा आहेत.

१८६० साली आर्चडीकन गेल या इंग्रजाने रात्री हा डोंगर


कळसूबाई ते हरिश्चंद्रगड (कच्चा नकाशा)
इगतपुरी,
कुलंगवाडी
आंबेवाडी
कुलंगगड
इंदोरे
बारी
अलंगगड,
मदनगड
कळसूबाई
घाटघर
भंडारदरा
साम्रत
रतनगड
रंधा धवधवा
रतनवाडी
कुमशेत
घनचक्कर
शिरपुंजे
संगमनेर
कात्राबाईची खिंड
भैरवगड
कलालगड
कुंजरगड उर्फ कोंबडकिल्ला
पाचनई
साधले घाट
हरिश्चंद्रगड
बाळू बाई
उ
माळशेज घाट
खिरेश्वर
भैरवगड उर्फ सारंगगड
खुबी
सिंदोला
प्र.के.

चढून शिखरावर पदन्यास केला. पण पहाटे येथून दिसलेल्या सूर्योदयाने प्रभावित होऊन त्याने 'दि किंग ऑफ द डेक्कन हिल्स' असे शिफारसपत्रच देऊन टाकले. कळसूबाईच्या चहूबाजूंना नजर फिरवली तर स्वच्छ वातावरणात अनेक डोंगरशिखरे अन् गडकिल्ले दिसतात. उत्तरेस आहेत रामसेज आणि देहेर, त्यांच्यामागील रांगेत अचला, अहिवंत, सप्तशृंग, मार्कंडा, रवळ्याजवळ्या, धोडप, राजदेहेर, कोळधैर, चांदवड, ही सातमाळ्याची दुर्गसाखळी गुंफलेली आहे. ईशान्येस बितनगड, औंढा, आड, पट्टा ऊर्फ विश्रामगड डोकावतात. त्यापलीकडे आहेत अणकाई-टणकाईचे जुळे दुर्ग, पूर्वेस विस्तीर्ण मुलूख दिसतो तो नजरेत सामावता येत नाही. दक्षिण दिशेला भंडारदरा धरणाच्या अवतीभवती पाबर, रतनगड, हरिश्चंद्रगड अशी थोर मंडळी विसावली आहेत. पश्चिमेस अलंग, मदन, कुलंग हे दुर्गम दुर्ग आणि दूर कोकणात असणारे माहुली, माथेरान, पेब ऊर्फ बिकटगड आहेत. हवा खूपच स्वच्छ असेल तर भीमाशंकरचा डोंगर अन् कदाचित खंडाळ्याचे नागफणी टोकही दिसू शकेल असे वाटते.

या शिखराच्या नावामागे एक गमतीशीर दंतकथा आहे. फार प्राचीनकाळी कळसू नावाची एक कोळ्याची पोर या रहाळात राहत होती. एके दिवशी ती आली इंदोरे गावी, कुणाकडे तरी ती कामाला राहिली. पण केरवारे आणि भांडी घासण्याचे काम न सांगण्याची बोली तिने मान्य करून घेतली होती. कुणीतरी या अटी मोडण्यासाठी तिच्यावर खूप दडपण आणलं आणि ती काम सोडून निघून गेली. तिला जिथं भांडी घासायला लावली ती जागा थाळेमेळ, आणि केर काढायला लावला ती जागा काळदरा या नावाने परिचित आहे. संन्यस्त वृत्तीने राहणाऱ्या या कळसूने आपला देह जेथे त्यागला त्या शिखरालाच लोक पुढे कळसूबाई म्हणू लागले. तिचे एक छोटसे मंदिरही तिथे

बांधले गेले. तेराव्या शतकात कोण्या बाबाजी कोळ्याकडे या डोंगराची व्यवस्था हाती. पण इथे काही किल्ला बांधला गेलाच नाही.

शिखरमाथ्याखालच्या टप्प्यावर एक छोटेखानी विहीर आहे. नुकतेच त्याजवळ एक पत्र्याचे खोपटही उभारले आहे. हाच तिथं जाणाऱ्या डोंगर-भटक्यांना निवारा. स्वर्शिया डिकसाटा म्हणजे पांढरी कवडी ही सोळाशे मीटर उंचीवर वाढणारी वनस्पती इथे मिळते. तिचा उपयोग कर्णरोगांवर केला जातो असे म्हणतात. केस्ट्रल, इंडियन रॉबीन, भारद्वाज, रेड व्हेंटेड बुलबुल, सातभाई, बगळे असे काही पक्षी या परिसरातील डोंगर-टेकड्यांत आढळतात. मात्र उटकमंड (खरं तर उधक मंगलम्) जवळील दक्षिण हिंदुस्थानातील दोडाबेट्टा ह्या सर्वोच्च शिखराशी कळसूबाई शिखराची तुलनाच करता येणार नाही. तिथली दाट झाडी, मुद्दाम राखलेला समृद्ध निसर्ग केवळ अप्रतिम. पण या पार्श्वभूमीवर हा उजाड-निर्जन-निर्जल मुलूख वैराणच भासतो. या ठिकाणी मुद्दाम आवर्जून जावे असे काहीच नाही. समाधान करून घ्यायचे ते केवळ एका शिखरावर जाऊन आलो असे सांगण्यापुरते. महाराष्ट्राचे एव्हरेस्ट जिंकल्याचे समाधान मिळवण्यापुरते.

## ३. किल्ले कांचन (कचना) : (जि. नाशिक)

कांचन ? हो, हो, कांचन म्हणजे सुवर्ण ! सोन्याने तेजाळलेल्या साक्षात लक्ष्मीचे इथे दोनदा दर्शन घडले ! एकदा तर हा सबंध पर्वतच सोन्याचा झाला होता आणि म्हणूनच कांचन या नावाने तो ओळखला जातो. कोणी त्यास कचना किंवा काचना असेही म्हणतात.

फार पूर्वीची गोष्ट. नवनाथांपैकी मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ ही गुरू-शिष्यांची जोडी नेहमीप्रमाणे प्रवास करीत करीत एका गावी आली. कर्म-धर्म-संयोगाने त्या राज्याचा राजा मृत्यू पावला होता. राजाच्या शवावर अंत्यसंस्कार व्हावयाचा होता, आणि काय आश्चर्य ! राजाचा देह हळूहळू हालचाल करू लागला. थोड्या वेळाने राजा पूर्ववत उठून बसला.

राजाच्या मृत्यूने दु:खित झालेल्या प्रजेला दु:खमुक्त करण्यासाठी मच्छिंद्रनाथांनी उचललेले हे पाऊल मात्र बरेच महागात पडणार हे जेव्हा कालांतराने गोरक्षनाथाच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी त्या विलासी राजाच्या राजवाड्यात, नृत्यनिपुण अशा गणिकेच्या मदतीने पखवाजवादक म्हणून प्रवेश केला आणि मृदुंगातून 'चलो मछिंदर गोरख आया' असे बोल उमटवले. मूळच्या संन्यासी वृत्तीच्या ह्या पुण्यपुरूषाने आपल्या सत्‌शिष्याचे ते म्हणणे मानले आणि राजाचा देह सोडून परत आपल्या शरीरात त्या पुण्यात्म्याने प्रवेश केला व गुरू-शिष्यांची ही जोडी राज्य सोडून निघून गेली.

ह्या आरण्यनिवासी साधूंना तपस्येसाठी निवांत जागा मिळाली आणि त्या तपस्येतूनच पुढे श्रीमच्छिंद्रनाथांना परीस प्राप्त झाला. खांद्यावरील झोळीतून देवांबरोबर ह्या परीसाचीही वाटचाल सुरू झाली. परंतु गोरक्षनाथांना हे लक्षणही ठीक वाटले नाही.

कांचन किल्ल्याच्या परिसरात हे दोघे आले असता गोरक्षनाथांना हवी ती संधी प्राप्त झाली. प्रातर्विधीसाठी मच्छिंद्रनाथांनी आपली झोळी गोरक्षनाथांकडे सांभाळावयास दिली. त्याचा फायदा घेऊन तो परीस त्यांनी फेकून दिला. पुढे मच्छिंद्रनाथांच्या ते लक्षात आले तेव्हा ते कांचनच्या पायथ्याशी होते. मच्छिंद्रनाथांच्या रागाचा पारा चढला. बऱ्याच वेळानंतर त्यांनी आपली सरबत्ती थांबवली आणि मग गोरक्षनाथांनी शांतपणे आपल्या कमंडलूतील तीर्थ जवळच्या

डोंगडावर शिंपडले. बघता बघता तो सबंध डोंगर सोन्याचा झाला. सोन्याचा डोंगर सूर्यकिरणांमुळे झळाळू लागला आणि मच्छिंद्रनाथांना आपली चूक कळून आली. मात्र हा सोन्याचा डोंगर असाच राहिला तर अनर्थ होईल, हे जाणून गोरक्षनाथांनी तो परत पाषाणाचा केला. ही गोष्ट याच ठिकाणी घडली, असे तेथील वृद्ध ग्रामस्थ मोठ्या अभिमानाने सांगतात.

दुसरी गोष्ट आहे अगदी अलीकडची. दिल्लींद्र औरंगजेबाची व्यापारी राजधानी असलेल्या सुरत शहराची बेसुरत श्री शिवाजीमहाराजांनी केली तेव्हाची ही गोष्ट. शेकडो घोडे, खेचरे धनाने शिगोशीग भरलेल्या थैल्यांचे ओझे घेऊन दुसऱ्यांदा चालली होती. एकदा १६६४ साली आणि मग पुन्हा १६७० सालच्या ऑक्टोबरमध्ये. अर्थात या वेळेस एका मोगल सुभेदारानेच भलतेच धाडस केले. बऱ्हाणपुराकडून बागलाणकडे हा सुभेदार झेपावू लागला. दाऊदखान त्याचे नाव. चार हजार फौज, प्रचंड दारूगोळा, हत्ती-घोडे, बऱ्याच काही पैशाअडक्यासह हा खान शिवाजीला गाठण्याच्या तयारीने आला होता.

राजांनी दोन हजार सैन्यासह लूट राजगडाकडे पाठवून दिली आणि कांचनाच्या पायथ्याशी असणाऱ्या कांचन-मंचना खिंडीत पंधरा हजार सैन्यासह तळ दिला. दाऊदखान पुढे झेपावला आणि व्हायचे ते होऊन गेले. ज्योतीवर झेपावणाऱ्या वेड्या पतंगासारखा त्याचा नाश झाला, पदरी अपयश आले.

या यशाच्या धुंदीतच मराठी सैन्याने कुंजरगडावर ऊर्फ कोंबडकिल्ला येथे तळ दिला. पुढचे बेत आखले गेले. बहादूरपूर, कारंजा अशी नामांकित व्यापारी ठाणी लुटून अहिवंत - रवळ्याजावळ्या - मार्कंडा हे गिरिदुर्ग पदरात पाडून घेतले. त्याच वेळी मोरोपंत पेशवे त्र्यंबकगड जिंकून राजांना साल्हेरच्या पायथ्याशी येऊन मिळाले. पुढे साल्हेर - मुल्हेर - हे बागलाणचे मानबिंदूही स्वराज्यात

दाखल झाले.

हा सारा शिवदिग्विजय कांचनापासून सुरू झाला, हे कळताच आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. कांचनाला त्याचे काही नाही. शिवसहवासाचे चार स्वर्गीय क्षण आपल्या उराशी कवटाळून तो त्याच धुंदीत बेभान झाला आहे.

तर असा हा किल्ला कोणाच्या विशेष ऐकण्यात नाही, बघण्यात तर नाहीच नाही. नाशिक जिल्ह्यातील चांदवडच्या वायव्येस १६ कि.मी. वर आणि कोळधैरच्या पश्चिमेस अवघ्या ३ कि.मी. वर हा किल्ला आहे. पायथ्याशी आहे कांचना-मंचनाची खिंड.

गडावर जायचे तर उत्तरेकडील बाजूने अत्यंत बिकट अशी चढण चढून मग एका विस्तीर्ण गवताळ पठारी प्रदेशावर यावे लागते. मग कारवीच्या अन् घाणेरीच्या बोचऱ्या अन् खाजऱ्या झुडपातून वाट काढीत तसेच वर जावे लागते. केवळ थोडकीशी तटबंदी अन् दोन दरवाज्यांचे चिरेबंदी पागोटे येथे चढवलेले आढळते.

ऐन शिवशाहीत अन् पेशवाईत या किल्ल्यावर विपुल पाणी असावे. त्याची साक्ष तेथील असंख्य खोदीव टाकी देतात. याशिवाय खडकात कोरलेली तळघरेही दिसतात.

गडाच्या पूर्वेकडील उंचच उंच भागाला ग्रामस्थ मंडळी 'नंदीबैल' म्हणतात. पण ह्या बैलोबाच्या पोटात मात्र गंगा-जमना टाक्यातील सुमधुर पाणी आहे.

तसे पाहिले तर थोडकेसे अवशेष, इवलासा इतिहास असणारा हा किल्ला ब्रिटिशांच्या इ.स. १८१८ च्या झंझावाती लढाईत बुलंद नि बेलाग त्रिंबकगडाचा पाडाव झाल्यावर त्यांच्या हातात अलगद, विनासायास पडला. त्रिंबक अन् त्यांचे हे इतर १८ दुर्गबंधू जूनच्या उत्तरार्धात १८१८ मध्ये इंग्रजांकडे गेले.

## ४. किल्ले त्र्यंबकगड (श्रीगड) : (जि. नाशिक)

गोदावरीच्या उगमाजवळ आहे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, त्यामागे उभा आहे ब्रह्मगिरी किंवा ब्रह्मशैल. गडाच्या दरवाज्याकडे जाणारी अरुंद वाट, दगडी प्रवेशद्वारे व जिने ही त्याची वैशिष्ट्ये. देवगिरीचा सम्राट रामचंद्रदेव यादवाने हा किल्ला जिंकल्याची नोंद आढळते. १६२९ च्या सुमारास शहाजीराजांनी केलेल्या उठावात त्र्यंबकगड ते जुन्नर हा प्रदेश त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात आला होता. १८१७ च्या लढाईत दुसऱ्या बाजीरावाकडून हा किल्ला इंग्रजांनी मिळवला. १८५७ मध्ये भिल्ल व ठाकरांनी इथला खजिना लुटला. त्यांना चिथावणी दिल्याच्या आरोपावरून वासुदेव भगवंत जोगळेकर यांना ब्रिटिशांनी मृत्युदंडाची शिक्षा दिली.

गडमाथा पायथ्यापासून खूप उंच पण शेवटचा टप्पा कातळभिंतीचा, तो १५० मीटर उंचीचा, वर सपाटी अशी नाहीच पण तो किलोमीटरभर लांबीचा माथा गंगाद्वार व कुशावर्ततीर्थ यांना सामावून घेत आहे.

१६२९ ते १६३६ हा शहाजीराजांचा कालखंड सोडला तर परक्यांच्या अंमलाखालचा हा किल्ला कार्तिक महिन्यात शके १५९२ मध्ये म्हणजे १६७२ इ.स. मध्ये तो मोरोपंतांनी जिंकून घेतला. १६८२ मध्ये त्यावर पुन्हा मोगलांचा अंमल सुरू झाला. १७५१ मध्ये त्रिंबक सूर्याजी प्रभू यांनी भेदनीतीने हा किल्ला बाळाजी बाजीराव प्रधान यांच्या आज्ञेवरून घेतला.

२२ एप्रिल १८१८ कर्नल मॅकडोवेलने त्र्यंबकगड ऊर्फ श्रीगड घेण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना अपयश आले. पण २४ एप्रिल १८१८ रोजी प्रखर हल्ल्यामुळे गडकऱ्यांना हत्तीमेट गमवावे लागले. पण हत्तीद्वारात १३ युरोपियन व ४ इतर यांना मरण पत्करावे लागले. त्यानंतर मात्र लगेचच हा किल्ला ब्रिटिशांना

मिळाला.

समुद्रसपाटीपासून १२९५ मीटर उंचीचा दुर्गमाथा ५ शिखरांचा आहे. येथून पश्चिमेकडे हरीष, भास्कर, पूर्वेला नाशिक, उत्तरेला वाघेरा, दक्षिणेला मात्र कावनई, त्रिंगलवाडी, कळसूबाई, कुलंग-मदन-अलंग, बितनगड, औंढा, पट्टा म्हणजे विश्रामगड अशी मंडळी दिसतात, गडमाथ्याच्या पूर्वभागात ऐतिहासिक अवशेष तर पश्चिम भागात गोदातीर्थ व गौतमीगंगेचा उगम आहे. गडाच्या उत्तर भाग दुर्गभंडार या नावाने ओळखले जातो. तेथे कडा कोरून केलेली वाट आपणास घेऊन जाते.

## ५. किल्ले देवगिरी (दौलताबाद) : (जि. औरंगाबाद/खडकी)

अजिंठा-वेरूळ या प्रसिद्ध लेण्यांमुळे आणि परळी-वैजनाथ, औंढ्या-नागनाथ व घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगामुळे परकीय व भारतीय अशा पर्यटकांचा ओघ औरंगाबादच्या बाजूला सतत वाढत आहे. औरंगाबादहून वेरूळच्या लेण्यांकडे जाण्याऱ्या हमरस्त्यावर डावीकडे प्रकर्षाने दिसणारा एक अजिंक्य, बेलाग नि बुलंद दुर्ग आहे किल्ले देवगिरी ! पर्यटन विकास महामंडळाने अजिंठा-वेरूळ या परिसराचा कायापालट बनविण्याचे मनात आणले आहे. हा बदल करताना जास्तीत जास्त पर्यटक या लोभसवाण्या दुर्गम दुर्गाकडे खेचून येतील अशी योजना आखावी.

राष्ट्रकूट राजा श्री वल्लभ याने या दुर्गाची उभारणी इसवीसनाच्या आठव्या शतकात केली. पुढे दुबळ्या केंद्रसत्तेचा फायदा घेऊन कल्याणीच्या चालुक्याची ताबेदारी झुगारून देऊन महासावंत यादव कुलोत्पन्न भिल्लम यादवाने या बलाढ्य दुर्गाच्या सहाय्याने आपली

स्वतंत्र राजवट सुरू केली. देवगिरी हे नाव कसे पडले ती आख्यायिका मोठी मनोरंजक आहे.

एके काळी आदिमाया पार्वती अन् भगवान महादेव याच परिसरात सारीपाट खेळायला बसले. त्या डावात पार्वती जिंकली, पण संसाराचा डाव उधळून देऊन श्री शिवशंकर वेरूळच्या घनदाट अरण्यात निघून गेले. देवी पार्वतीने भिल्लिणीचे रूप घेतले व तीदेखील त्या वनात वास्तव्य करण्यास गेली. शंकर व ती भिल्लीण यांचे प्रेम जडले. कुणाचा संपर्क नको म्हणून सर्व देवादिकांना (व पर्यायाने देवी पार्वतीला) वेरूळच्या डोंगरावर येण्यास बंदी केली. पण शिवशंकराच्या सहवासाला आतूर झालेले सर्व देव नजीकच्याच एका डोंगरावर रहावयास गेले तोच हा डोंगर देवगिरी.

दुसरी एक उपपत्ती अशी : यादव राजे आपल्या नावापुढे 'देव' हे पद लावीत असत. कृष्णदेव, महादेव, रामदेव, हरदेव व त्यांचा तो देवगिरी. पण देवगिरी हे नाव या राजकुलापेक्षा अधिक प्राचीन आहे.

याच किल्ल्याला देवगड किंवा धारागिरी असेही संबोधीत. पण दौलताबाद हे नाव अधिक प्रचलित आहे. दौलत + आबाद म्हणजे खूप धनसंपदा असणारे स्थान अशी याची फोड आहे.

या भूमीला साजेलसे मूळचे नावच रूढ व्हावे. 'देव देवळी परिवारू कोरून काढिला डोंगरू' असे म्हणणाऱ्या श्री ज्ञानेश्वरांनी 'मग कुंडलिनीयेचा टेंभा, आधारी केला उभा । तया थोपविले प्रभा, निमयावरीत' असा दृष्टांत दिला आहे, तो देवगिरीच्या दुर्गरचनेचाच संदर्भ तर नसेल ना?

या परिसरात उभारल्या जाणाऱ्या अभयारण्याला देवगिरी अभयारण्य हेच नाव आतापासून प्रचलित करावे.


उभ्या महाराष्ट्रात देवगिरीसारखा किल्ला नाही. चोरवाटा,

भुयारे, फसवे रस्ते, दुर्लध्य खंदक, तासलेले कडे अन् अभेद्य तटबंदीने युक्त असा हा दुर्गराज म्हणजे एका प्रचंड भुईकोट किल्ल्यामध्ये सुरक्षित सांभाळलेले दुर्गरत्न आहे. या भुईकोट किल्ल्याला ७ वेशी असून २ कि.मी. लांबीचा अभेद्य तट आहे. त्याला कटक म्हणतात. तर आतला बालेकिल्ला हा आसपासच्या पठारी प्रदेशापेक्षा सुमारे दोनशे मीटर उंचीचा आणि पटावरच्या सोंगटीसारखा अगदी उठून दिसणारा असा आहे. त्यात प्रवेश करणे आजही अवघड आहे. एकापाठोपाठ तीन दरवाजे, त्यांच्या तट, बुरूजावरील बुलंद तोफा अन् पहारेकऱ्यांच्या देवड्या पाहिल्या म्हणजे त्यांना चुकवून कसे जाता येईल, असे वाटते. पुढच्या मोकळ्या भागात आपल्या दृष्टीस पडतो एक उंच स्तंभ, काही तज्ज्ञांच्या मते तो प्राचीन वेधशाळेचा अवशिष्ट भाग आहे, तर काहींच्या मते हा जयस्तंभ आहे. चितोडसारखा ! तर काही याच्या उभारणीचे श्रेय इ.स. १४४५ मध्ये राज्य करणाऱ्या अहमदशहा अलीला देतात. चांगला ७० मीटर उंचीचा अन् बुंध्याशी २० मीटर परीघाचा हा ४ मजली स्तंभ चढून जाण्यास आतून पायऱ्या आहेत. प्रत्येक मजल्याचे वर सज्जा आहे. त्यावरून दिसणारे दृश्य अप्रतिम आहे.

जयस्तंभाच्या समोर आहे बंदिस्त पटांगण. हत्ती हौद, येथे हत्ती झुलत असत अन् त्यांची ही जलक्रीडेची जागा होती असे मानतात. पण यात हत्ती उतरणे किंवा उतरलेला हत्ती त्यातून बाहेर पडणे शक्य होईलसे वाटत नाही.

५० मीटर लांब, ३० मीटर रुंद अन् ७ मीटर खोल, अशा हौदाच्या चारही काठांवरील तटावरून चक्कर मारता येते. तेथे जवळच भारतमातेचे मंदिर आहे.

यांच्यापुढे आहे काळाकोट दरवाजा. दरवाजा कसला, ते एका राक्षसी विवराचे तोंडच आहे. आतल्या राज्यकर्त्यांच्या मर्जीत


यादवांचा देवगिरी (कच्चा नकाशा)
उ
वेरुळकडे
अंबरकोट
महाकोट
खंदक
टाके
बालाकोट
जनार्दन स्वामी तपस्या स्थान
श्रीदुर्गा तोफ
श्री रासाईदेवी मंदिर
बारादरी,
गणेशमंदिर
चांदमिनार
फसवे भुयारी मार्ग
चिनी महाल
हत्ती तलाव
सरस्वती विहीर
भारतमाता मंदिर
निजामशाही महाल
राष्ट्रकूटकालीन लेणे
औरंगाबाद (खडकी) कडे
प्र.के.

असेल तरच यातून परत बाहेर पडता येईल. येथे एका महालाचा काही भाग आहे. तोच चिनी महाल. शिवस्नुषा येसूबाई अन् युवराज शाहू यांनी येथेच बंदिवास भोगला. पुढे हेच नष्टचर्य शिवरायांना दक्षिणेकडील मोहीम यशस्वी करण्यास मदत करणाऱ्या गोवलकोंड्याचा सुलतान अबुल हसन तानाशहाच्या नशिबी आले, तेही इथेच.

यानंतर आहे अंधारी भुयारी मार्ग. २० मीटर लांबीचा अन् नंतरचा १७ मीटर लांबीचा. यालाच मोठी अंधेरी किंवा मशाल के बंगला असे म्हणतात. हा अंधारी मार्ग मोठा खडतर आहे. तो सरळ तर नाहीच, पण त्यातही फसव्या वाटा आहेत. अगदी शेवटी एक जाड लोखंडी तवा आहे. त्यावर सरपण ठेवून पेटविले की हा बंदिस्त भुयारी मार्ग म्हणजे भट्टीच होते आणि गार वारा येणाऱ्या दिशेकडे गेले म्हणजे तेथून रवानगी थेट खालच्या खंदकात, तोही सुसरी-मगरींनी युक्त. याशिवाय सहज दृष्टीस न पडणारा एक झरोका आहे. त्यातून शत्रूचे अंगावर उकळते तेल ओतत असत. मुंबईच्या केव्ह एक्सप्लोरर्स संस्थेच्या धाडसी सभासदांनी या भुयारी मार्गातील फसव्या वाटांचा एप्रिल १९८६ मध्ये वेध घेतला होता.

आता मात्र या ठिकाणी शासनाने मशाल पेटवून रस्ता दाखवण्यास माणूस ठेवला आहे. खरं तर मशालीसारखे दिसणारे विजेचे दिवे लावावेत.

शिल्पज्ञ हेमाद्री, भागवताचा भाष्यकार व प्रसिद्ध वैय्याकरण बोपदेव, संगीतकार शाङ्र्गदेव, गायक गोपालनायक, महाकवी नरेंद्र, कल्याणीचे विज्ञानेश्वर, अपरांतातील अपरार्क या सर्वांचा कल्याणकारी राजा येथे राहून महाराष्ट्राच्या सौभाग्यलक्ष्मीला सनाथ करीत होता.

आजवरच्या ज्ञात इतिहासावरून हा किल्ला एकदाही सरळ जिंकला गेला नाही. फितुरी ! या एकमेव रोगाने हा किल्ला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २८६५ दिनांक २६।११।८३
विषय बा. वा. क्र. ..........

पोखरला गेला, तेव्हाच तो शत्रुपक्षाच्या हाती पडला. ६ फेब्रुवारी १२९४ रोजी हा किल्ला जो परस्थ जुलमी राजांच्या हाती पडला, त्याला स्वातंत्र्याचा वारा लागावयाला सुमारे सहाशे वर्षे लागली. १७ सप्टेंबर १९४९ हा तो सुदिन.

महाराष्ट्रात आहेत तितके किल्ले आणि देखणी लेणीही कोठे नाहीत. लेण्यांच्या राण्या अजिंठा आणि वेरूळ यांच्याजवळ हा दुर्गराज आहे. पण इतर दुर्गांचे समग्र दर्शन घडवणारे एक कायमचे प्रदर्शन येथे उभारले तर देशी-परदेशी पर्यटकांना ते एक मोठे आकर्षण होईल. महाराष्ट्राच्या दुर्गरत्नांचा परिचय करून देणारे एक छायाचित्र प्रदर्शन, महाराष्ट्राच्या उठावाचा विशाल नकाशा, या किल्ल्यावरच्या सचित्र, सुबोध पुस्तिका, रंगीत व कृष्णधवल पोस्टकार्ड आकाराची भेटकार्डे येथे उपलब्ध व्हायला हवीत.

या किल्ल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अगदी माथ्यावर असणाऱ्या गुहेतील श्री जनार्दन स्वामी यांचे स्मृतिस्थान ! संत एकनाथांचे एक गुरू, पण तशी माहिती खाली मिळत नाही. पण खाली एखादा फलक लावून ही माहिती सर्वांना मिळण्याची व्यवस्था हवी. किल्ल्याचा एक नकाशा सर्वांना दिसेल असा तयार करावयास हवा. त्यात कोठे काय पहावयाचे याचाही उल्लेख हवा. पण सारं करायचं म्हणजे मुळातच या ऐतिहासिक स्थानावर प्रेम हवे. या स्फूर्तिस्थानांचे इतरांना अधिक चांगले दर्शन घडावे अशी इच्छा हवी. सरकारी नियमांच्या गुंताड्याचा बाऊ न करता त्यातून वाट काढायला हवी. ते होत नाही.

# ६. किल्ले धोडप : (जि. नाशिक)

नाशिक जिल्ह्याच्या मधोमध सुरगण्यापासून चांदवडपर्यंत एक लांबच लांब रांग पसरली आहे. शिवशाहीपासून ते अगदी पेशवाईअखेरपर्यंत बराच इतिहास या परिसरात घडला आहे. अचला, अहिवंत, सप्तशृंग, मार्कंडा, कान्हिरा, रवळ्याजवळ्या, धोडप, कचना ऊर्फ कांचन, कोळधैर, इंद्राई, चांदवड अशी अपरिचित दुर्गमालिका याच डोंगरात गुंफली गेली आहे. साधारणत: किल्ल्यांच्या नावामागे गड किंवा दुर्ग उपपद लाभलेले असते. पण वरील दुर्गाच्या नावातच ही उपपदे नाहीत. हा मुलूख काहीसा उपेक्षित राहिला. साल्हेर-मुल्हेर, सप्तशृंग अशी काहीशी नावे क्वचितच कोणी ऐकली असतीलही, पण उरलेल्या उपेक्षित मानकऱ्यांचे काय ? तेथील गौरवास्पद इतिहास आम्हाला कसा विसरता येईल ? पैकी धोडप किल्ल्याचा हा अल्पसा परिचय.

चांदवडच्या वायव्येस २०-२५ कि.मी. उंचीचा आपला किंचित कलता माथा उभारून श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या विजयाचे स्मारक बनलेला हा किल्ला बुलंद आहे. बेलाग आहे. उपेक्षित आहे.

नाशिक-सटाणा मार्गावरील वडाळा भोई गावापर्यंत नाशिकहून द्रुतगती वाहनाने पोहोचता येते. तेथून पुढे धोडंबे या तळवटीच्या गावापर्यंत पायी जावे लागते. अलीकडे पावसाळा सोडल्यास एस.टी. बसही तेथपर्यंत जाते. वडाळा भोई गावातून उत्तरेकडे नजर टाकली तर आपले लक्ष प्रकर्षाने वेधून घेणारा एक सुळका दिसतो आणि त्याच्या पश्चिमेकडे गेलेल्या निव्वळ काळ्या पाषाणाच्या नैसर्गिक सोंडेवरील खाच तर वैशिष्ट्यपूर्णच भासते.

धोडंबे गावातून किल्ल्यावर जायची वाट मात्र घाणेरी अन् निवडुंगाच्या काटेरी झुडपांना लगटून गेली आहे. गडाच्या ऐन

पायथ्याशी खवेवाल्यांची वस्ती आहे. ही वस्ती फार पूर्वीपासून तेथे असावी, असे त्यांच्या जोत्यांवरून वाटते. छोटेखानी मंदिरे, चंद्रमौळी घरे, दाट झाडी, वस्तीबाहेरील भव्य प्रवेशद्वार, जवळील शिलालेख, वीरगळ ही सर्व आपणास एका वेगळ्याच वातावरणात घेऊन जातात. तेथील रानमेवा, बांधीव विहिरीतील थंडगार पाणी, निर्भेळ दूध व खवा यामुळे येथील अल्पसा मुक्कामदेखील चिरस्मरणीय ठरतो.

गावातून किल्ल्याच्या दिशेने थोडेसे पायवाटेने वर गेले की उभ्या कड्यात खोदलेल्या अरुंद पायऱ्या जवळ कराव्या लागतात. बहुतेक किल्ल्यांची व बालेकिल्ल्यांची प्रवेशद्वारे दगडी असतात. तेथे मात्र दगड, विटा यांचा सरमिसळ वापर केलेला आढळतो. येथून थोडेसे पुढे जाताच थोडेसे उंचावर हनुमान टाके व मारूतिरायाची कोरीव मूर्ती आहे. थोडे प्रस्तरारोहण करून वर जावे किंवा पुन: प्रवेशद्वारापाशी येऊन सोप्या मार्गाने चढ चढून वर जावे आणि भुयाराचे तोंडाशी यावे. ४-५ मीटर रुंदीचे हे भुयार म्हणजे बालेकिल्ल्याला मिळालेले वरदान. हे एवढे लढविले म्हणजे पुरे. येथून पुढे गेल्यावर अत्यंत चिंचोळा सपाटीचा प्रदेश डावीकडे, तर थोड्याशा पसाऱ्याचे गवताळ पठार उजवीकडे येते. डावीकडून पुढे जाताच सुळक्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गुहा, पाण्याची टाकी इत्यादि गोष्टी आता दुर्लक्षिल्यामुळे केविलवाण्या अवस्थेत पोहोचल्या आहेत.

लोहगडाच्या विंचूकाट्यासारखे एक लांबच लांब लांगूड या ठिकाणी आपणास दृष्टीस पडते, मात्र ते मध्येच खंडित आहे. ही नैसर्गिक भिंत चांगली तीन साडेतीनशे मी. लांब अन् चार-पाच मी. रुंद आहे. माथ्यापासून खालचा टप्पा चांगला साठ-सत्तर मी. या भिंतीच्या अर्ध्या लांबीवर तीस मी. लांबी-रुंदीचा टवका कुणी छिनून काढल्यासारखा आहे व किल्ल्याकडील टोकाकडे

एक घुमटी बांधलेली आहे.

किल्ल्याच्या टोपीच्या आकाराच्या सुळक्यास स्थानिक लोक शेंडी किंवा शेंबी म्हणतात. तेथपर्यंत चढून जाणे म्हणजे प्रस्तरारोहणाची कसोटीच आहे. या डोंगररांगेतील सर्वाधिक उंची असणारे हे शिखर आहे. मात्र त्याच्या पाव उंचीवर असणाऱ्या खोदीव गुहेत, थोड्या सायासाने सहज जाता येते. तेथे पूर्वी टेहळणी नाके होते.

साहसी तरुणांनी या सुळक्याचे आव्हान स्वीकारून तेथे जायलाच हवे. तेथून वर उल्लेखलेली संपूर्ण दुर्गमालिका बंड्या, इखारा, हंड्या, लेकुरवाळी ही शिखरे तर दिसतातच, पण साल्हेर, सालुता, हरगड, मुल्हेर, मोरा, हरीष, भास्कर, त्रिंबक, वाघेरा, रामसेज, अंकाई, टंकाई, कंक्राळ हे गिरीदुर्गही नजरेस पडतात.

राघो भरारीने स्वराज्याच्या मानबिंदूला - छत्रपतींच्या पेशव्याला स्थानभ्रष्ट करण्याचा डाव रचला होता, पण धोडपच्या किल्ल्याखाली झालेल्या हातघाईच्या लढाईत राघोबादादांचा मोहरा इरेला पडला. चिंतो विठ्ठल जायबंदी झाले, तर मोरो विठ्ठल मारले गेले. पराभूत झालेला राघोबादादा धोडप किल्ल्यावर आश्रयाला गेला. परंतु श्रीमंत माधवरावांनी पटवर्धन रामचंद्र गणेश, विसाजीपंत कृष्ण यांना किल्ल्याची मोर्चेबंदी करण्याचा आदेश दिला. दुसरे दिवशी सरदार गोपाळराव पटवर्धन पेशव्यांच्या आज्ञेने गडावर गेले आणि मसलत यशस्वी करून परतले. राघोबादादांनी बिनशर्त शरणागती पत्करली. ते पायउतार होऊन माधवराव पेशव्यांच्या छावणीत बंदिवान म्हणून दाखल झाले.

इ. स. १८१८ च्या शेवटच्या इंग्रज-मराठा युद्धात ब्रिग्ज या सेनापतीच्या तुकडीने हा किल्ला प्रतिकार न होता जिंकून घेतला.

धोडपच्याच पूर्वेकडे हा उंचच उंच सुळका आहे. त्याचे

नाव 'इखारा'. चिमनी क्लाइंविगं या प्रस्तररोहण प्रकारचा हा बागलाणी बेत. पंधरा-वीस मी. उंचीची ही दगडातील भेग चढून जाण्यात साहस आहे.

या सुळक्यावरील कोणा अनामिक निसर्गदेवतेची खूण म्हणून एक उंचच उंच काठी व तिला टोकदार लटकावलेले पांढरे शुभ्र फडके ज्या कोणा भक्ताने येथवर आणले असेल, त्याला सुळक्याखालच्या शेकडो मीटर उतारावर मात करून या भेगेतून वर येऊन ही वेगळी पूजा करण्यास लाभलेल्या अनोख्या भक्तीपुढे आपली मान लवते व मन थक्क होते.

इखाऱ्याच्या सुळक्यातील एक व्यवस्थित बांधलेले पांढरेशुभ्र रंगवलेले मंदिर आहे. श्वान, गोमाता आणि वृक्षवल्लरींशी सोबत राखून एक नाथपंथीय साधू येथे राहतो. स्वच्छता आणि टापटिपीचे या बुवांना अतोनात वेड. फळझाडे, फुलझाडे यांनी सजवलेले हे स्थान खरोखर अवर्णनीय आहे.

पुणे, मुंबई, नाशिक येथील निसर्गअभ्यासक, पर्यटक, इतिहासप्रेमी गिर्यारोहक या सर्वांना धोडप-इखारा साद घालत आहे.

## ७. किल्ले रतनगड : (जि. नगर)

नाशिक अन् नगर जिल्ह्यांच्या सरहद्दीवर एक आडवीतिडवी डोंगररांग पसरली आहे. याच डोंगर-रांगेत महाराष्ट्राचे एव्हरेस्ट विसावले आहे. शैल कळसूबाई. दख्खनची अनभिषिक्त सम्राज्ञीच. तिच्या भोवताली तशाच तोलामोलाचे मानकरी उभे आहेत. त्यांपैकी एक आहे किल्ले रतनगड. रतनगडावर रत्नूबाईच्या गुहेत उगम पावलेली प्रवरा, भंडारदऱ्याजवळ प्रचंड बांध घालून जरी अडवली

२८६४
वा.वा.



असली तरी या दुर्गकन्येचा अल्लडपणा जवळच्या रंधा धबधब्याशी साकारालेला आढळतो.

प्रवरेचं मूळ शोधायला निघाले की मन विस्मयाने थक्क होते. श्रीशंकर हा तसा रानावनात राहणारा देव, त्याचं स्थानही अशा अनगड जागी असतं की थोडे तरी कष्ट केल्याविना तेथे जाताच येऊ नये. पण एकदा का तिथं गेले म्हणजे निर्भेळ आनंद उपभोगायला मिळतो. भंडारदरा धरणाशेजारी आता चांगलं गावठाण उभं राहिलं आहे. त्याला शेंडी म्हणतात. दर रविवारी तिथं बाजारही भरतो. शेंडीहून मुरशेत या १-१॥ कि.मी. वरच्या गावी गेलं की रतनवाडीला जायला होडी मिळते. तिच्यातून पलीकडे जाता येते. रतनवाडीच्या तीन वाड्या आहेत. त्यांच्यापैकी तीर्थाच्यावाडीत महादेवाचे नितांत रमणीय देवालय आहे.

शिखर, सभामंडप अशा सर्व अंगोपांगासह चांगले ८-९ मीटर उंचीचे एक अतिदेखणे शैलशिल्प तिथे अजूनही उभे आहे. तिथपर्यंत जाईतोवर कल्पनाही येत नाही की इथे इतके चांगले मंदिर असेल म्हणून. मंदिराच्या विस्तृत प्राकारात काही कोरीव शिल्पकलेचे अवशेष विखुरले आहेत. मंदिराला जोडून नंदीची मंडपी आहे. मंदिराची उंची सुमारे चार मीटर आहे व त्यावर कोरीव कामाने नटलेले पाच-सहा मीटर उंचीचे शिखरही आहे. नंदीच्याविरूद्ध दिशेचे मंदिराचे प्रवेशद्वार थेट बुद्धगयेच्या मंदिराच्या प्रवेशद्वारासारखे आहे.

आधार खांब आणि छतावर भरपूर कोरीव काम, यक्ष-किन्नरांच्या मूर्ती, पुराणातील प्रसंग यांची लयलूट आहे. अधिक लक्ष वेधून घेते ती समुद्रमंथनाची छतपट्टी, कीर्तीमुखे, नृत्यशिल्पे, छिद्रित कोनाडे असे बरंच काही देखणे आहे.

अनंतेश्वर महादेवाचे मंदिरापासून थोड्या अंतरावर एक पुष्करणी आहे. 'विष्णूतीर्थ' तिचं नाव. साधारणपणे दहा मीटर औरसचौरस

असे हे तीर्थ, चारही बाजूंनी बांधून काढलेले आहे. त्यात अनेक कोनाडेही आहेत. प्रत्येकात एकेक मूर्तीही आहे. एक शेषशाहि विष्णूची, एक गणपतीची, एक देवीची अन् उरलेल्या कोनाड्यात निरनिराळी आयुधे धारण केलेल्या विष्णूच्या मूर्ती आहेत. जवळच वीरगळाशी साधर्म्य असणारे काही कोरीव दगडही आहेत. खुद्द पुष्कर्णीतील पाण्याला फारसा उपसा नाही, पण तरीही ते उत्तम स्थितीत आहे.

या सर्व परिसराचा उल्लेख बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत आढळतो, तो असा :

''श्री महादेव रतनगडी किल्ल्याखाली आहे. त्यास बालाजी कराळे यांनी किल्ले रतनगड घेते समयी नवस केला. त्याप्रमाणे किल्ले रतनगडपैकी देविले सदरहू सामान श्रीच्या गुरवाजवळ देऊन नित्य नैवेद्य व नंदादीप ताकीद करून चालविणे म्हणोन मोरा महादेव यास सनद.''

तर रतनवाडीतील हे असे देखणे शिल्प पाहून रतनगडाकडे कूच केले की दीड-दोन तासांत गडाचे माथ्यावर पोहोचतो. मात्र त्याआधी सुमारे पंधरा मीटर उंचीचा एक कडा लागतो. तो चढून जाण्यास एक लोखंडी शिडी लावली आहे. सुमारे आठ मीटर उंचीच्या या शिडीच्या माथ्यावर पाच मीटर अंतर कड्यात खोदलेल्या अरुंद पायऱ्यांवरून पार करावे लागते. मग थोडी सपाटी व त्यानंतर परत पायऱ्या.

त्यानंतर एक गणपतीची कोरीव मूर्ती असणारा दरवाजा सामोरा येतो. तेथून उजवीकडची वाट रत्नादेवीच्या गुहेत नेते, तर डावीकडची गडाच्या दुसऱ्या दरवाजाकडे या दुसऱ्या दरवाज्यावर मत्स्यावतार, हनुमान, सूर्य, मगर, वेताळ, गणपती, ऋद्धिसिद्धी या रेखीव आणि बरेचसे कोरीव काम आहे.

गडाच्या माथ्यावर जावयाच्या आधी खाली मोठे गवताळ

पठार आहे. तेथे अनेक टाकी, इमारतीचे भग्न अवशेष व राणीचा हुडा या नावाने ओळखला जाणारा गोल बुरूज आहे. गडाच्या कातळमाथ्याभोवती प्रदक्षिणा घालता येते. त्या प्रदक्षिणा वाटेवरच रतनवाडीकडील दरवाज्यांची दुक्कल, कोकण दरवाजा अन् त्रिंबक दरवाजा ऊर्फ साम्रत गावाकडील दरवाज्याची जोडगोळी आहे.

गडावर आणखी एक ठिकाण आहे. मुद्दाम जाऊन पहावे असे हे स्थान निसर्गनिर्मित आहे. मल्हारगड, लोहगड, राजगड, कुलंगगड या गडांसारखे याही गडाला एक आरपार छिद्र किंवा नेढं आहे. दीड-दोन मीटर उंचीचे अन् चार-पाच मीटर रुंदीचे हे नेढं नैसर्गिक आहे. तेथून भंडारदरा जलाशय, पाबरगड, अलंगगड, मदनगड, कुलंगगड, आवंढागड, पट्टा ऊर्फ विश्रामगड, वितनगड, चंदेरी-म्हसमाळ, मलंगगड, भीमाशंकर-सिंधगड असा बराच मोठा परिसर न्याहाळता येतो. त्यांचा पूर्वपरिचय मात्र हवा.

साहेबाचे राज्य होण्यापूर्वी रतनगड या दुर्गम, बुलंद, बेलाग आणि प्रबळ अशा स्थानाला फार महत्त्व होते. राजूर, अलंग हे घाटमाथ्यावरचे अन् सोकुली, वाडी व जुरूस्त्रोशी हे कोकणातले महाल रतनगडाच्या अधिपत्याखाली होते. अलंग, मदन, कुलंग, ही दुर्गत्रयीदेखील रतनगडच्या अधिकाऱ्यांचे मानीत होती.

कॅप्टर गोडार्डने या किल्ल्यावर १८२० मध्ये प्रत्यक्ष ताबा मिळवून तेथेच तळ ठोकला पण पुढे त्याचा मुक्काम हलताच पूर्वीचा किल्लेदार गोविंदराव याने रामजी भांग्रियाच्या नेतृत्वाखालील उठावात या किल्ल्याचा ताबा घेतला.

रतनगडाचा सलग असा इतिहास ज्ञात नाही. तेथे घडलेल्या चकमकी, युद्धे, लढाया, मोहीमा, यांची नोंद आढळत नाही. येथे शत्रूशी झुंज देताना वीरगती मिळालेल्यांची आठवण नाही. पण म्हणून नगर जिल्ह्याचे महाबळेश्वर बनू शकणाऱ्या या नितांत रमणीय स्थानाची आपण चालवलेली हेळसांड क्षम्य नाही.

पक्षी-निरीक्षकांना व वनस्पती-संकलकांना भंडारदऱ्याचा समृद्ध जलाशय व आसपासचा प्रदेश, निसर्गप्रेमींना रंधा-पाबर, भाविकांना श्री अनंतेश्वर महादेवाचे रतनवाडीचे देखणं देवालय, साहसी पर्यटकांना व गिर्यारोहकांना कुलंगगड, मदनगड, अलंगगड, कळसूबाई, रतनगड, आजोबा ऊर्फ अजापर्वत. हरिश्चंद्रगड हा परिसर नक्कीच भुरळ घालील.

पर्यटन व्यवसायाला विकसित करण्यासाठी स्थापन झालेले महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ या भंडारदऱ्याभोवती पसरलेल्या रौद्र, भीषण सुळक्यांवरच्या गडांचा विकास करुन पाहिल तर पर्यटकांचा ओघ नक्कीच इकडे वळेल. पण तोपर्यंत आपल्याला थांबायचे काहीच कारण नाही. एखादा सुट्टीचा दिवस पहा अन् चला रतनगडाकडे.

## ८. किल्ले वसई : (जि. ठाणे)

**शर्थीने जिंकलेला दुर्ग.**

''किल्ला हाती येत नाही, तर निदान माझे मस्तक तरी तोफेने उडवून ते किल्ल्यात जाऊन पडेल असे करा !'' असे निर्वाणीचे उद्गार चिमाजीअप्पाने काढले मात्र, आणि मराठ्यांनी निकाराचा लढा देऊन उत्तरेतील या फिरंगाणाचा नायनाट केला. त्याचे वर्णन करताना कवी म्हणतो,

''तीन वर्षे राज्य वसवून, मोर्चे बसवून, सभोवती धमामी। सुरुगांनी पाडिला अलगद बुरूज बदामी । हल्ल्यात उडाले लोक, करिति किति शोक, पडून संग्रामी । नऊ लक्ष बांगडी फुटली वसई मुक्कामी ॥''

प्रचंड पराक्रम करून प्राप्त केलेल्या विजयाबाबतचे खुद्द

चिमाजीअप्पांचे उद्‌गारदेखील त्या पराक्रमाची साक्ष देतात - ''यामागे युद्धे बहुत प्राप्त झाली, परंतु मराठी फौजेस यासारखे युद्ध पडले नाही. सीमासीमाच केली. त्याचा विस्तार लिहिता विस्तार आहे. या जागा फत्ते होणे देवाची दया आहे.''

**सुलभ मार्ग.**

ह्या धारातीर्थाचे दर्शन घेणे फारच सुलभ आहे. मुंबईहून वसईरोड स्टेशनपर्यंत लोकलने जावे. तेथून परिवहन महामंडळाची बस आपणास वसई गावात घेऊन जाते. बस-स्थानकापासून अक्षरश: दहा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या ह्या ऐतिहासिक स्थानाशी जावयास टांगेदेखील मिळतात.

दशकोनी आकाराच्या ह्या किल्ल्याचे आत जवळजवळ २ कि.मी. परिघाचा प्रदेश समाविष्ट आहे. डांबरी सडकेने गेल्यास आपला प्रवेश तट फोडून तयार केलेल्या नव्या रस्त्याने होतो. मात्र किल्ल्याचे खरे प्रवेशद्वार तेथून थोडे उजव्या हातास आहे. दुहेरी तटबंदी असलेल्या ह्या दारातून प्रवेश करणे म्हणजे मृत्यूच्या खाईत स्वत:ला लोटून घेण्यासारखे होते.

याखेरीज किल्ल्याचे पूर्वेस मांडवी बंदराकडून किल्ल्यात प्रवेश करण्यास दुसरा दरवाजा आहे. पश्चिम व दक्षिण दिशेकडील खाडी व पूर्वेकडील खाजणाची जमीन यामुळे फक्त उत्तरेकडील जमिनीकडील बाजू ही जरा कमकुवत पण अधिक काळजीपूर्वक बंदिस्त केलेली आढळते. भोवतालच्या दलदलीमुळे ओली वाळू पोखरून सुरुंग पेरणंदेखील तितकेच कठीण.

२ मे १७३९ रोजी निकराचा हल्ला करून सॅबॅस्टिअन बुरूजाच्या बाजूने सुरुंग लावून व प्रचंड हातघाईची लढाई करून ४ मे १७३९ रोजी ह्या बलाढ्य स्थानाचा ताबा मराठी सत्तेकडे आला आणि अर्नाळा, वरसोवा, धारावी याही ठिकाणी विजय

मिळवून टोपीकर फिरंग्यांचे या भागातून साफ उच्चाटन केले गेले.

**भग्न अवशेष.**

किल्ल्यामधील प्रमुख अवशेष म्हणजे प्रचंड चर्चेस् (गिरिजा घरे.) १) सॅबॅस्टिअर बुरूजाजवळील फ्रान्सिस्कन चर्च ऑफ द इनव्होकेशन ऑफ सँटो अँटीनिओ ऊर्फ अँथनी चर्च - या ठिकाणीच सेंट झेविअर (ज्याचे शव अद्यापही गोव्यामध्ये सुस्थितीत आहे.) २-३ वेळा उतरला होता.

२) फ्रान्सिस्कन चर्चच्या अग्नेय दिशेस असलेले सेंट पॉल्स चर्च ऑफ चर्च ॲण्ड मोनेस्ट्री ऑफ दि जेसुइटस् ऊर्फ जेसुइटांचे चर्च - याची बांधणी १५७८ मध्ये झाली.

३) बालेकिल्ल्यालगतचे चर्च ऑफ नोसा सेन्होरा डा व्हिडा - यामध्ये इंग्रजांनी एक साखरेचा कारखानादेखील चालवला होता.

४) किल्ल्याच्या अग्नेय तटाला खेटून असलेले दि कॅथिड्रल ऑफ सेंट जोसेफ - याचे वैशिष्ट्य म्हणजे मुसलमानी अमलातील मशिदीचे रुपांतर या प्रार्थनाघरात केले आहे.

या चर्चच्या बांधकामात एक उंच टेहळणीची जागा दिसते. चर्चचे पुढील प्रांगणात पूर्वी बाजार भरत असे.

५) याखेरीज दि डोमिनिकन चर्च ॲण्ड कॉन्व्हेंट हे १५८३ साली उभारलेले चर्च व त्या काळचे हॉस्पिटल आहे.

अर्थात आजमितीस या सर्व वास्तू आता ढासळू लागल्या आहेत. पोर्तुगीजांनंतर मराठे व इंग्रज या दोन्ही सत्तांनी केलेले दुर्लक्ष यास कारणीभूत आहे.

**इतिहास.**

प्राचीन काळी वसईजवळच सोपारा या गावी असलेल्या हिंदू राज्यसत्तेच्या ताब्यात हा प्रदेश होता. मात्र त्या काळी वसईस एवढे महत्त्व नव्हते. इ.स. १३४८ ते १५३६ या काळात मूर व मुसलमान राज्यकर्त्यांच्या ताब्यात हा प्रदेश होता. व्यापाराचे मिषाने आलेल्या पोर्तुगीजांनी प्रथम वखारीसाठी दिल्लीपतींची परवानगी घेतली. मग बंदोबस्तासाठी सैनिक, त्यांच्यासाठी दारूगोळा व हत्यारे, नंतर कोटाचे बांधकाम केले; त्यासाठी आधीचा किल्ला पाडून १५९० मध्ये आत्ताचा किल्ला बांधला. इ. स. १७३० पासून ते १७६९ पर्यंत प्रतिकार करून शेवटी थोरल्या बाजीरावांचे बंधू चिमाजीअप्पा पेशवे यांनी २ लक्ष सैन्य वापरून पोर्तुगीजांना पायबंद घातला. त्यानंतर काही काळ तो इंग्रजांकडे होता व परत मराठ्यांकडे आला. अखेरीस १८१७ मध्ये इतर किल्ल्यांबरोबर हाही किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

वसईच्या किल्ल्यात एक अतिशय दुर्मिळ गोष्ट होती. पण आपल्या करंटेपणाने ती नष्ट झाली. नारळाच्या व ताडाच्या झाडांस फांद्या नसतात. पण इ.स. १९३७ मध्ये जवळजवळ २०-२५ फांद्या फुटलेले एक प्रकारचे ताडाचे झाड होते. किल्ल्याचा तट पाडून अधुनिकीकरणाच्या नादात ह्या झाडास धोका पोहोचला व हा दुर्मिळ ठेवा नाहीसा झाला. त्याच्या खोडाचे जतन करणेदेखील कोणाला सुचले नाही किंवा जमले नाही.

**उभारलेली मंदिरे.**

याखेरीज किल्ल्यामध्ये ४ देवळे आहेत. पैकी दोन बलभीम हनुमानाची. बंदराकडील प्रवेशद्वाराजवळ असलेल्या मारुतिरायाची स्थापना खुद्द चिमाजीअप्पांनी केली आहे. दुसरा मारुतिराया जमिनीकडील दरवाज्याजवळ असून तो अगदी अलिकडे स्थापन

केला गेला आहे.

किल्ल्याच्या मध्यभागी वज्रेश्वरीचे देऊळ आहे. सुप्रसिद्ध वज्रेश्वरी येथील देवीला केलेल्या नवसाची पूर्तता करण्यास पेशव्यांनी हे मंदिर बांधले. त्याच्या शेजारीच श्री महादेवाचे आधुनिक बांधणीचे रम्य मंदिर आहे.

किल्ल्याच्या बाहेर गळबावडी ऊर्फ गोडबाब ह्या भागात मराठ्यांचा तळ पडला होता. तेथे जवळच एका सरदाराच्या सती गेलेल्या पतिव्रतेचा पार आहे. याखेरीजं शेट राजाणी वकिलांचे बंगल्याचे मागील बाजूस बाळाजीपंत मोरे यांची समाधी आहे. यांचे धड शिरावाचून काही काळ लढत होते असे सांगितले जाते. याखेरीज बहादूरपुरा भागातही काही ऐतिहासिक अवशेष आढळतात.

मुंबईहून वसईच्या किल्ल्याला भेट देऊन जवळच असलेल्या अर्नाळा ह्या जंजिऱ्यास भेट देऊन, एका दिवसात इतिहासाच्या स्फूर्तिस्थानांचे दर्शन घेता येते. या ऐतिहासिक वास्तू आपण प्राणपणाने जपल्या पाहिजेत. तेथील ओजस्वी इतिहासाचे धडे त्या ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांना दिले पाहिजेत. मात्र पर्यटनाचे नावाखाली गळ्यात ट्रांझिस्टर अडकवून, हातात बाटली अन् मैत्रिणींचा तांडा घेऊन फिरणारे अनेक महाभाग आपणास येथे आढळतात. त्यामुळे मात्र मन खिन्न होते. आपल्या इतिहासाची अन् स्फूर्तिस्थानांची बूज आपणच राखली पाहिजे.

## ९. किल्ले साल्हेर–सालोटा–मुल्हेर आणि मोरा–हगरड : (जि. नाशिक)

बागलाण ! सुपीक, संपन्न मुलूख ! महाराष्ट्राच्या

स्वातंत्र्यलक्ष्मीला तहान लागली होती धनाची. बागलाणातील धनश्री अन् साल्हेरी-मुल्हेरीस यशश्री प्रसन्न झाली आणि शिवरायांच्या कीर्तित अन् खजिन्यात आणखीच भर पडली.

नोव्हेंबर १६७० मध्ये बहादूरपूर अन् कारंजावर शिवाजी महाराजांनी यशस्वी मोहीम केल्याची बातमी कळताच चवताळलेला दाऊदखान कुरेशी दर्गापूरहून धावत आला. पण त्याचा पराभव करून साल्हेरचे परशुराम स्थान महाराजांनी मुक्त केले. पराक्रमाने पावन झालेली ही भूमी एकदा नजरेखालून घालायलाच हवी. मात्र त्यासाठी पायगाडीचे प्रवासी बनण्याची तयारी हवी.

महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे शिखर, शिवाय परशुरामगडाच्या ऐन शिखराच्या उत्तरेस अंदाजे तीस मीटर अंतरावर, मानवी पावलाच्या चौपट मोठे असे धनुर्धराच्या पवित्र्यातील पावलांचे खळगे आहेत. जिंकलेल्या पृथ्वीचे दान दिल्यावर स्वत:साठी सागराला मागे हटवून अपरांत निर्माण करण्यासाठी श्री परशुरामांनी बाण सोडला तो येथूनच. साल्हेरवरून कोकणाकडे दृष्टी टाकल्यास समोरच्या डोंगरास असलेले आरपार छिद्र हा त्या बाणांचाच प्रताप असे तेथील रहिवासी सांगतात. परशुरामाच्या मातेचे - रेणुकादेवीचे देऊळही जवळच आहे.

डांग-गुजरात अन् देशावरील बागलाण यांना जोडणाऱ्या व्यापारी महत्त्वाच्या सहा वाटांवर हेरगिरी करण्यास उपयुक्त म्हणून सहाहेर - साल्हेर अशी नावाची उपपत्तीही आपणास येथे ऐकवली जाते.

दीड कि.मी. लांब अन् १ कि.मी. रुंदीच्या या गडाचा पश्चिमेकडील शैलकडा हरिश्चंद्र गडाच्या कोकणकड्याची आठवण करून देतो. याशिवाय गडावरील महत्त्वाचे स्थान म्हणजे गंगासागर तलाव. गायकवाड सरकारच्या गादीमुळे ओळखल्या जाणाऱ्या गादी-पठारावर सुबक बांधणीचा अन् विस्तीर्ण असा जलाशय म्हणजे गंगासागर. हिरवट छटा असणाऱ्या या पाण्याचा रंग दर


बारा वर्षांनी दुधी होतो. त्या वेळेस प्रत्यक्ष गंगामाई तेथे अवतरली असे समजून तेथे भली मोठी जत्रा भरते. गंगामाई पावली म्हणजे सगळीकडे शुकशुकाट असतो. मग येथे असतात गुराखी. कधीमधी दुर्गप्रेमी, साहसी पर्यटक येतात.

पृथ्वीदानासाठी श्रीपरशुरामाने केलेल्या यज्ञभूमीचे दर्शन आपणास गंगासागराजवळील यज्ञकुंड व यज्ञस्तंभ यामुळे घडते. गादी पठारांच्या दक्षिणेस आहे तो साल्हेरचा निकटचा शेजारी 'सालोटा' किंवा 'सालुता!' जुजबी तटबंदी, २-३ प्रवेशद्वारे व हनुमान मंदिर आणि पाण्याच्या टाक्यांशिवाय येथे काहीही नाही. साल्हेर-सालुताच्या खिंडीजवळच वाघांबे नावाचे खेडे आहे म्हणून त्या खिंडीस वाघांब्याची खिंड म्हणतात.

पूर्वेकडील मोरा, पश्चिमेकडील हरगड अन् मधला मुल्हेर असं हे खरं त्रिकूट आहे. खुद्द मुल्हेरचे पायथ्याचा मुल्हेरमाची व वरचा बालेकिल्ला असे दोन स्वतंत्र भाग आहेत.

सिंहगडावरील देवटाक्याच्या चवदार पाण्याशी स्पर्धा करणारा मोती तलाव, सुबक बांधणीची चंदनबाव ही विहीर, श्रीराम, सोमेश्वर व गणपती यांची उत्तम मंदिरे, प्राचीन संपन्नतेच्या खुणा दाखवणारा (आता ढासळलेला) विस्तीर्ण राजवाडा अशा कितीतरी प्रेक्षणीय वास्तू मुल्हेरच्या माचीवर आजही दृष्टीस पडतात. मुल्हेर माचीवरील या राजवाड्याजवळच उंबराच्या झाडाखाली आपणास एक चिणलेला दरवाजा आढळतो. तळघराकडे नेणाऱ्या या भुयारी मार्गांचे नीट उत्खनन झाल्यास काही महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

मुल्हेरच्या वरच्या किल्ल्यावर-बालेकिल्ल्यावर जाण्यास पूर्वेकडून व पश्चिमेकडून वाटा आहेत. मात्र दुर्लक्ष झाल्यामुळे आज यांचा मागोवा घेतच पुढे जावे लागते. वर्षाकालात पाणी असणारी टाकी उन्हाळ्यात साफ आटून जातात. ऐतिहासिक


साल्हेर-मुल्हेर परिसर (कच्चा नकाशा)
रतनगड उर्फ न्हावी किल्ला
मांगी
तुंगी
भिलवड
मुल्हेरगाव
देरगाव
ताहिराबाद
मोरा
मुल्हेर
हरगड
प्र.के.
सटाणा
डांग सौंदाणे
चौलेर
केळझर उर्फ ततणे
सालोटा
वाघांबे
साल्हेर
चिंचली
सह्याद्रीच्या मुख्य कणा
उ.

वास्तूंचे पडीक अवशेष, ओहोरलेली टाकी व लांबच लांब सपाट पठार याखेरीज 'भडंगनाथ' हे नाथपंथीय एक मंदिर आहे. तांब्याचा मुखवटा असलेल्या या छोटेखानी मंदिरावर रानटी झाडाने आपले छत्र उभारून थंडावा निर्माण केला आहे. बराच झिजलेला परंतु अक्षरे सुस्थितीत असणारा एक शिलालेख तेथे आहे.

१८१८ च्या शेवटच्या मराठे-इंग्रज युद्धानंतरही काही वर्षे या किल्ल्यावर चार प्रचंड तोफा असल्याचे उल्लेख आढळतात. फत्तेलष्कर, रामप्रसाद, शिवप्रसाद, व मार्कंडेय अशी त्यांची नावेही होती. पैकी शेवटची ब्रिटिशांनी वितळवली. बाकीच्यांची सद्यस्थिती ज्ञात नाही.

मुल्हेरच्या डाव्या-उजव्या अंगाला उभे राहून शत्रूवर पाळत ठेवणारे मोरा व हरगड हे किल्लेदेखील मुल्हेरप्रमाणेच बेवारस झाले आहेत. मोरा किल्ल्यावर गणपती, हनुमान व महादेवाची उद्ध्वस्त मंदिरे, काही टाकी, छोटेखानी तळे, पडीक तटबंदी व दारूखान्याची इमारत आहे. वर जावयाचा रस्ता खडकात खोदून काढलेला आहे. मोरा किल्ला मुल्हेरपेक्षा उंचीने अधिक आहे. हरगडाचा वर जाण्याचा रस्ता तेथील माहितगारांखेरीज सापडू शकत नाही, गवताळ निसरडी अन् मुरमाड घसरडी वाट आपणास हरगडाच्या विस्तृत गवताळ पठारावर घेऊन जाते. कशीबशी तग धरून राहिलेली थोडीशी तटबंदी अन् काही टाकी यांच्यासोबत एका तोफेखेरीज इतिहासाचे अन्य साक्षीदार नाहीत.

नाशिकहून मुल्हेरला जाणाऱ्या (सटाणामार्गे) गाडीने मुल्हेरला येऊन मोरामुल्हेर-हरगड या त्रिकुटाचे दर्शन घ्यावे. सायंकाळी मुल्हेरपासून जवळच असलेल्या मांगी-तुंगी या आवळ्या-जावळ्या जैन शैलशिल्प मंदिरांचे दर्शन घेण्यासाठी भिलवाडा गावी जावे. गावातील देवस्थानच्या धर्मशाळेत पाणी, वीज, खोल्या अशी उत्तम सोय आहे. आधी वर्दी दिल्यास जेवणाचीही सोय होऊ

शकते. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे मांगी-तुगी या सुळक्यांभोवती असणाऱ्या जैन लेण्यांतील मंदिरे पाहून मुल्हेरहून वाघांब्याकडे (अगर अहलियाबादला जाणाऱ्या गाडीने तेथे उतरून चालत वाघांब्याला) जावे. रात्री वाघांबे येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी साल्हेर या महाराष्ट्राच्या, उंचीने दुसऱ्या क्रमांकाच्या स्थानाकडे जावे. वाघांबे खिंडीतून वर चढल्यावर डावीकडे असलेल्या सालुता किल्ल्याचे दर्शन घ्यावे. मग सुरती पोळ मार्गाने साल्हेरच्या गादी पठारावर यावे. सायंकाळी खाली उतरून जवळच असलेल्या केळझर (म्हणजेच तताणे) गावाजवळ बांधकाम चालू असलेल्या धरणाचे गावात मुक्काम करावा. दुसऱ्या दिवशी सटाणामार्गे नाशिकला पोहोचता येते.

यापेक्षा अधिक दिवस असल्यास मांगी-तुंगीजवळील न्हावीगड ऊर्फ रतनगडही या दुर्गयात्रेत अंतर्भूत करता येईल.

साल्हेर व मुल्हेरवरून अचला, अहिवंत, सप्तशृंग, मार्कंड, रवळ्या, जावळ्या, धोडप, कचना, कोलधैर, राजधैर, इंद्राई, चांदवड अशी किल्ल्यांची लांबच लांब साखळी, अंकाई-टंकाई, रामसेज असे अनेक किल्ले सहज दृष्टीस पडतात. बागलाणातील या बेलाग अन् बुलंद किल्ल्यांना भेट देऊन तेथील इतिहासाचे स्फूर्तिदायी स्मरण करणे, त्या मुलखात पायगाडीवर स्वार होऊन केलेल्या दुर्गयात्रेस खर्चही कमी येतो, चला केव्हा निघताय या बागलाणच्या मानबिंदूच्या दर्शनाला?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. २८६५ दिनांक २६।११।८३
विषय बा.वा. क्र.

# १०. किल्ले तुंग (कठीणगड) व तिकोना (वितंडगड) : (जि. पुणे)

**पवन मावळाची संरक्षक दुर्गजोडी.**

तुंग म्हणजे कठीणगड आणि तिकोना म्हणजे वितंडगड! मुंबई-पुणे हमरस्त्यापासून जवळ असून देखील विशेष ज्ञात नसलेली ही जोडगोळी पवना नदीवरील पवना धरणाजवळ आहे. फागणा धरणाच्या जलाशयातून या दोघांचे होणारे दर्शन मोठे रमणीय आहे. किल्ले व त्यांची प्रतिबिंबे मोठी मोहक दिसतात. अतिप्राचीन लेणी व दुर्ग हे बहुधा जवळजवळ आढळतात. ऐतिहासिक किल्ले व नव्याने बांधलेली धरणे वा छोटेमोठे बंधारे हेदेखील असेच जवळजवळ आहेत. हा काही निव्वळ योगायोग नाही. लेण्यांचे खोदकाम झाले. बळिवंत दुर्गांच्या आश्रयाने आणि धरणबंधाऱ्याचे बांधकाम पाणलोटाच्या क्षेत्रात डोंगररांगांच्यानजीक होते. डोंगरमाथे व गिरीदुर्ग हे नाते अतूटच आहे. हे सारं सांगायचं कारण म्हणजे पूर्वीच्या भोर संस्थानातील (सध्याच्या वडगाव-मावळ तालुक्यातील) ह्या किल्ल्यांपैकी तिकोना किल्ल्यावर देखील एक उपेक्षित लेणे आहे. हा किल्ला, हे लेणे सारे काही फार फार उपेक्षित राहिले आहे. त्याची माहिती करून घ्यायला हवी.

**किल्ले तुंग उर्फ कठीणगड.**


वडगाव मावळ तालुक्यातील ह्या किल्ल्यावर जाण्यासाठी पुण्याहून लोणावळा लोकलने कामशेतला उतरावे व तेथून तळेगाव ते काळे कॉलनी ही बस पकडावी. पवन धरणातील लाँचच्या मदतीने तुंगच्या पायथ्याशी यावे. तेथे थोड्या थोड्या उंचीवर काही वस्त्या आहेत. वरच्या वस्तीतील मारुती मंदिरापासून किल्ल्याच्या उत्तुंग सुळकेवजा ठिकाणी जायला वाट आहे. प्रवेशद्वाराशी

कमान कशीबशी तग धरून आहे. तेथे काही खोदीव पायऱ्याही आहेत. तेथून वर जाताच श्री तुळजाईचे मंदिर व पाणीपुरवठ्याचा गडावरील एकमेव जलाशय आहे. तेथून खडकाळ उभ्या वाटेने वर गेल्यावर अगदी टोकावर श्री तुंगी देवीचे मंदिर आहे. जवळच उजव्या हातास कड्यावर ओठंगलेल्या प्रचंड प्रस्तरात एक खोलीवजा कृत्रिम खोदकाम आहे. त्याला तळाजवळ एक छिद्र आहे. रात्री गडावर मुक्काम करायचा झाला तर नाहीतर गडाखाली वस्तीवर मुक्काम करावा हे उत्तम. गडावर पाहण्यासारखे तसे काहीही नाही. येथे विशेष असा काही समरप्रसंगही घडलेला नाही. येथील अवशेष पाहता येथे फारशी वस्ती असण्याचाही संभव कमीच वाटतो. एक चौकीवजा बलिष्ठ ठाणे इतकेच याचे स्वरूप असावे. अर्थात हा मात्र तर्क.

**किल्ले तिकोना ऊर्फ वितंडगड.**

ह्या किल्ल्यावर जायला पुणे-कोळवण बस उपयोगी पडते किंवा कामशेतवरून काळे कॉलनीमार्गे तिकोना पेठेत पोहोचता येते. तुंग व तिकोन्यामध्ये सरळ रेषेत जेमतेम ३-४ कि.मी. अंतर असेल. तिकोना पेठेतून आपला प्रवेश होतो उभ्या कड्यावरून एकदम दरवाज्यात. गडाचा माथा थोडाबहुत त्रिकोणी आकाराचा आहे म्हणून ह्या तीन कोनांच्या किल्ल्याचे नाव तिकोना. गडावर प्रवेश करण्यास चार दरवाजांची मालिका ओलांडावी लागतेच. ऐन गडमाथ्यावर त्रिंबकेश्वर महादेवाचे छोटेखानी मंदिर, एक तलाव किंवा हौद, २ तळी व धान्य कोठाराचे पडीक अवशेष आढळतात. तर बालेकिल्ल्याच्या खालच्या भागात श्रीतळजाईचे मंदिर आहे.

पुण्यातील डेक्कन कॉलेजतर्फे श्री तळजाईमंदीर असलेल्या लेण्याचा शोध घेतला गेला. डॉ. सांकलिया, श्री. प्रभाकर कुलकर्णी



वडगाव मावळ अन् पवन मावळ, (कच्चा नकाशा)

व डॉ.सौ. शोभना गोखले यांनी हे काम केले. त्यांच्या प्राथमिक अहवालानुसार हे लेणे सातवाहनोत्तर कालीन असावे. या दक्षिणाभिमुखी लेण्यात, पश्चिमेच्या बाजूस खडकात एक टाके खोदलेले आहे. डोंगरावरून वाहत येणारे पाणी या टाक्यात साठविण्याची योजना त्यात आहे. परंतु या लेण्याचे खोदकाम अर्धवट झाले आहे. त्याच्या कारणांची निश्चिती मात्र करता येत नाही. या लेण्यातील गर्भगृहाची खोली नंतर खोदकाम केलेली असावी असाही अंदाज आहे. लेण्यासमोरच एक तळेही आहे. या लेण्याजवळच सातवाहनकालीन जोत्याची तळीही सापडली आहेत. ह्यावरुन येथे खोदकामाच्या वेळी वस्ती असावी असा अंदाज बांधता येतो. लेण्यासमोरच एक सतीचा दगड आहे. त्यावरील कोरीव काम दोन भागांत कोरलेले आहे. या शिल्पात वरच्या बाजूस एक पुरुषाकृती असून त्याच्या पायाखाली बाई दाखविलेली आहे. पुरुषाकृतीच्या कमरेस लंगोटीसारखे वस्त्र आहे व तिचा आवेश मारूतीसारखा भासतो. शिल्पात खालच्या भागात दोन स्त्रिया असून त्यांच्या हातात फुलांच्या माळा आहेत.

महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवर अशी अर्धवट लेणी आहेत. काहींचा शोध संशोधकांनी घेतला आहे. काही अजून असंशोधित आहेत, काही दुर्गप्रेमी इतिहासाची गोडी असणारे असतात. पण काहींनी वनस्पतिशास्त्रदृष्ट्या, तर काहींना प्राणिशास्त्रदृष्ट्या (कीटक, फुलपाखरे, पक्षी, सस्तनप्राणी, इतर प्राणी इ.), काहींनी भूशास्त्रदृष्ट्या, काहींनी पुरातत्त्व अभ्यासकाच्या दृष्टीकोनातून या किल्ल्यांचा अभ्यास करायला हवा. नुसते 'किल्ले-शिवाजी' अशी जोडी लावून उपयोग नाही. एखाद्याने दुर्गांवरील ऐतिहासिक अवशेष व किल्ल्यांवरील कोरीव कामे यांचा अभ्यास केला तरी तो पी.एच्. डी. च्या तोडीचा संशोधन विषय ठरेल.

पर्यटन म्हणजे चार हौशी प्रवाशांना हिंडवून त्यांच्या खिशातील

पैसे आपल्या (किंवा आपल्या देशबांधवांच्या) खिशात आणणे नव्हे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाने अशा हौशी संशोधकांना हा अभ्यास करण्यास उत्तेजन दिले पाहिजे व परदेशस्थ आणि भारतीय बांधवांच्या वर उल्लेखिलेल्या एकेका दृष्टिकोनातून अभ्यास केलेल्या संशोधकांच्या मार्गदर्शनाखाली 'गायडेड टूर्स' आखल्या पाहिजेत. लोणावळ्याच्या आसपास असणारे अनेक तलाव, हे किल्ले यांचा उपयोग करून हा सर्व भाग 'ट्रेकर्स पॅरेडाइज' म्हणजे भटक्यांचे नंदनवन म्हणून सहज विकसित करता येईल. तसे प्रयत्न मात्र व्हायला हवेत.

## ११. किल्ले कुर्डू (विश्रामगड) : (जि. रायगड)

पुण्यापासून अवघ्या ९० कि.मी. पश्चिमेस असणारा हा एकाकी लहानखुरा किल्ला. त्याला विशेष प्रकाशात आणले ते कै. दत्तोबा पासलकर यांनी. बाजी पासलकरांच्या थोर कुळीशी नाते सांगणाऱ्या ह्या धडपड्या गृहस्थाने पुस्तिका, लेख, प्रदर्शने, यांतून दुर्गप्रेमी जनतेस ह्या अनगड किल्ल्याचा परिचय करून दिला. तोही अस्सल ऐतिहासिक पुराव्यांनिशी. सह्याद्रिच्या कुशीत पुणे व रायगड जिल्ह्यांच्या सरहद्दीवर रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात ह्याचा समावेश होतो. माणगावपासून २० कि.मी. वरील ह्या किल्ल्याचा माथा समुद्रसपाटीपासून ७०० मीटर उंचीवर आहे. समुद्रसपाटीपासून जरी उंची कमी असली तरी खडी चढण किंवा लांबच लांब अशा उजाड मार्गाने हा किल्ला जवळ करावा लागतो म्हणून हा सतत उपेक्षितच राहिला आहे आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे, चित्तथरारक प्रसंगही येथे घडल्याचे ज्ञात नाही. किल्ल्यानजीकच पायथ्याशी श्री कुर्डाई देवीचे मंदिर

आहे. त्यावरूनच किल्ल्यास किल्ले कुर्डू हे नाव मिळाले. बाजी पासलकरांनी विश्रांतीकालासाठी या किल्ल्याचा उपयोग केल्याने त्यासच विश्रामगड हेही नामाभिधान प्राप्त झाले असे समजतात.

**किल्ल्यावर कसे जावे?**

पुण्याहून सकाळी व दुपारी अशा दिवसात दोनदा एस.टी. बसेस सुटतात व त्या आपणास थेट मोसे खुर्द गावी नेतात. तेथून गाडीरस्त्याने आडमाळ, पडळघर, भुईनी, मुगाव, कोळशी ह्या रस्त्याने धामणव्हळ गाव उजवीकडे ठेवून वाघजाईच्या घाटाने खाली कोकणात उतरता येते. नुकत्याच पुऱ्या झालेल्या वरसगावच्या बाजी पासलकर धरणामुळे हा रस्ता आता पाण्याखाली गेला आहे. गर्द वृक्षराजीतील घाटाने गेले असता सुळक्याप्रमाणे दिसणारा कुर्डू किल्ला नजरेस पावतो. पायथ्याशी असणाऱ्या कुर्डू पेठ ह्या गावातून १५-२० मिनिटांत आपणास किल्ल्यावर पोहोचता येते. मोसे ते कुर्डू पेठ ७-८ तास पायी चालत जाण्यास लागतातच. याखेरीज कोकणातूनही ह्या किल्ल्यावर जाता येते. माणगाव तालुक्यातील कोस्त निजामपूर मार्गे शिरवली ह्या गावी एस.टी. ने पोहोचता येते. तेथून जिते ह्या गावाकडून धावडीच्या वाटेने किंवा बैलवाटेने कुर्डू पेठ येथे येता येते. मुंबई ते शिरवली (अनुकूल परिस्थितीत जिते ह्या गावापर्यंत) एस. टी. ने येता येते.

**पाहण्यासारखे बरेच काही.**

किल्ल्याच्या पायथ्याशी कुर्डाईचे अलिकडेच जीर्णोद्धार केलेले मंदिर व कुर्डेश्वर महादेवाचे मंदीर आहे. देवीचे देवळाकडून म्हणजे पश्चिमेकडून थोडीशी चढण चढून गेले म्हणजे पाण्याचे टाके लागते. कुर्डू पेठ ह्या गावास येथूनच पाणीपुरवठा होतो. गावची

वस्ती प्रामुख्याने कोळी व धनगर जमातीची आहे. तेथून थोडेसे अवघड कड्यावरून मुरमाड, घसरड्या, वाटेने आपण एका प्रचंड शिलाखंडाशी येतो. येथून उत्तरेकडील हनुमान बुरूजावर आपण येतो. या बुरूजावरच १ मीटर उंचीची एक हनुमानाची मूर्ती आपल्या नजरेस पडते. काही वर्षांपूर्वी नजीकच्या सुळक्यावरून काही प्रचंड शिळा खाली पडल्या व त्यात ती मूर्ती भंगली व खाली पडली. (ती माझ्या दुर्गप्रेमी मित्रांच्या मदतीने ११ एप्रिल १९७६ रोजी परत उभी केली) किल्ल्यामध्ये एक प्रचंड सुळका आहे व हनुमान बुरूजांच्याच पातळीत त्यास एक प्रचंड घळ आहे. हजार बाराशे माणसे सहज बसू शकतील अशी घळ प्रामुख्याने निसर्गनिर्मित व नंतर त्यात मानवी परिश्रमाने फेरफार झाल्याच्या खुणा आढळतात. ह्या धुळीस उजवीकडे ठेवून पूर्वेस गेले म्हणजे एक उत्तम बांधणीचा बुरूज आढळतो. तेथून खाली सरळ तुटलेला कडा आहे. त्यामुळे त्यास कडेलोटाचा बुरूज असे स्थानिक लोक मानतात. परंतु तेथून कडेलोट केलेल्या प्रसंगाची ज्ञात नोंद आढळत नाही. हा किल्ला तसा आडबाजूला असून विशेष महत्त्वाचा नसल्याने अशा सुविधेची येथे आवश्यकताही नसावी असे वाटते.

याच बुरूजावर उभे राहून दक्षिणेकडे नजर टाकल्यास एक छोटा सुळका एका मोठ्या सुळक्यापासून अलग झालेला दिसतो. त्या दोघांच्यामधील खिंडीत आपणास थोड्याशा कौशल्याने जाता येते. अगदी खिंडीत आपणास एक नैसर्गिक खिडकी आढळते. तेथून कोकणातील दूरवरचा मुलूख सहज नजरेस पडतो. प्रत्येक दुर्गयात्रिकाने आपल्या विश्रामगडाचे भेटीत ह्या निसर्गनिर्मित 'विंडो पॉइंट' ला अवश्य भेट द्यावी.

किल्ल्यावर पाण्याची काही टाकी (पैकी एक सोडता उरलेली बुजलेली अगर ओहोरलेली), काही पडीक अवशेष आढळतात.

किल्ल्यास एकच प्रवेशद्वार असावे असे वाटते व तेही आता भग्नावस्थेतच आहेत.

**किल्ल्यासंबंधीची आख्यायिका.**

किल्ल्याच्या दक्षिण भागात एक बऱ्याच उंचीवर मोठी घळ आढळते. पूर्वी तेथे जाण्यास मार्ग असावा. आता तेथील कडा ढासळल्याने व वाट मोडल्याने वर जाता येत नाही. पूर्वी ह्या किल्ल्यावर याच घळीत एक तपस्वी, हिंदू साधू रहात होता. त्याच्याकडे एक शिवलिंग बाण होता व त्याची बारा वर्षे (एक तप) अखंड पूजा करणाऱ्यास राज्यप्राप्ती होईल अशी त्याची श्रद्धा असल्याचे समजल्याने वीर बाजी पासलकरांनी तो बाण मिळविला व आपल्या धन्यास नजर केला. पुढे शिवाजी महाराजांना राज्यप्राप्ती झाली. शिवछत्रपतींच्या निधनोत्तर कालखंडात छत्रपती राजारामांच्याबरोबर सिंहगडावर हा बाण नित्यपूजेसाठी आणला गेला व त्यांच्या मृत्यूनंतर हा बाण तेथे बांधलेल्या समाधीवर ठेवला गेला. पूर्वी हा बाण नित्य पाझरत असे. आता तो किंचित भंगल्याने फक्त ओलसर लागतो, मध्यंतरी हा बाण कोणीतरी अनाधिकाराने येथून हलविला. सध्या हे शिवलिंग साताऱ्याच्या जलमंदिरात पूजेसाठी ठेवलेले आहे असे कळते.

इतरही अनेक किल्ल्यांप्रमाणे हाही किल्ला शिवाजी महाराजांनी बांधला अशी समजूत आढळते. वीर बाजी पासलकर, येसाजी कंक, (गॅझेटियर्सचे म्हणण्यानुसार) बाजींचा विश्वासू एल्या मांग, बाजीचा आश्रित अनंता खुरसुले, जंजिऱ्याचे सिद्दी, थोरले बाजीराव, खंडोजी मानकर, अमृत पासलकर, नाना फडणीस, रामाजी गोविंद कारखानीस इत्यादी थोर ऐतिहासिक वीरपुरुषांचा काही कारणांनी ह्या किल्ल्याशी संबंध आलेला आढळतो.

पुण्याहून पानशेत, मोसे, धामणव्हळ मार्गे जाण्याचा रस्ता

आता नवीनच झालेल्या वरसगांव ऊर्फ बाजी पासलकर धरणामुळे पाण्याखाली गेला आहे. परंतु त्यामुळेच धामणव्हळ गावापर्यंत लाँचेसचीही सोय होऊ शकेल. कदाचित ह्या विस्तीर्ण जलाशयाने तेथील उघड्या बोडक्या रांगा पूर्ववत हिरव्यागार होतीलही. मात्र आज मितीस हा किल्ला पाहण्याचा उत्तम कालावधी म्हणजे नोव्हेंबर ते जानेवारी. वातावरणातील थंडावा, हिरवागार परिसर व पाण्याची मुबलकता यामुळे दुर्गभ्रमंतीस हा काल अत्युत्तम ठरतो.

## १२. कोकणदिवा : (जि. पुणे)

रायगडच्या उत्तरेस अदमासे ६-७ कि.मी. वर ऐन सह्याद्रीच्या रांगेत एक सुळका आकाशात उंच घुसलेला दिसतो. किंचित सपाट माथा असणारे हे शिखर (समुद्रसपाटीपासून) ८०० कि.मी. उंचीचे आहे. लिंगाण्याइतपत स्पष्ट नसले तरी बरेचसे सुस्पष्ट दर्शन ह्या कोकणदिव्यावरुन रायगडाचे होते. कोकणदिव्यावरुन पाहिले असता डाव्या हातास भवानी टोक व उजव्या हातास टकमक टोक अशा एका वेगळ्याच बाजूने होणारे हे दर्शन विलक्षण लोभसवाणे आहे. तेथून जगदीश्वर मंदिर परिसर, नगारखाना ह्यांचे दर्शन होते.

रायगडाचे सभासदाने केलेले वर्णन - ''राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे.'' - येथून पाहिले असता अचूक लागू पडते. सोंगटीसारखा दिसणारा रायगड व कोकणदिवा यांच्यामधील कोकणच्या तळवटीच्या प्रदेशातून काळ नदी वाहते.

**बिकट वाट.**

मात्र ह्या कोकणदिव्याच्या शिखरावर आरुढ होणे थोडेसे बिकट आहे. एक अंगमोड भ्रमंती आणि प्रस्तरारोहणाचे थोडेसे 'थ्रिल' अनुभवायचे असेल तर कोकणदिव्यावर जायलाच हवे. पुण्याहून महाराष्ट्र राज्य परिवहन बसने पानशेतला जावे. रात्री पानशेत येथे मुक्काम करावा. पहाटे ५॥-६ ला दूध गोळा करावयाला जाणाऱ्या लाँचने १॥-२ तासात गोंडखल गावी पोहोचता येते. गोंडखल गावातून घोळ खिंडीतून घोळ गावी यावे. यापुढील मार्ग मात्र पायवाटेचा. प्रथम अडीच-तीनशे मीटर खाली उतरून ओढा ओलांडून परत तितकंच वर चढून पुढची डोंगररांग मागे टाकली की आपण गारजाईवाडी ह्या चिमुकल्या खेडेगावात येतो. आपल्या जंगलथैल्या तेथील लोकांच्या घरी टेकवाव्यात आणि कॅमेरा, बायोनॉक्युलर असे आवश्यक सामान घेऊन निघावे. एक छोटीशी टेकडी ओलांडली की हा कोकणदिवा नजरेस पडतो.

दुपारी ३॥-४ पर्यंत कोकणदिव्यावर सहज पोहोचता येते. प्रथम कारवीचे जंगल आणि नंतर मुरमाड घसरडी वाट आपणास ह्या शिखरांच्या पायथ्याशी घेऊन जाते. एक भली थोरली गुहा आणि नजीकचे थंडगार पाणी यांच्या जोडीला वाऱ्याच्या मंद झुळका मन प्रसन्न करतात. यापुढची ऐन शिखरावरची चढण मोठी रोमांचकारक आहे. निखळ पाषाणावर चिमुकला मानव किती तोकडा पडतो याचा अनुभव येथे येतो. अखेरीस जिद्द आणि थोडेसे प्रस्तरारोहणाचे तंत्र या जोरावर शिखरावर पोहोचले म्हणजे सामोरे येतो तो किल्ले रायगड.

रायगड म्हणजे दुर्गदुर्गेश्वर. त्याचे येथून होणारे अपरिचित पण यथार्थ दर्शन रायगडाचा भेदकपणा मनात चांगलाच ठसवतो. डाव्या हातास लिंगाणा व तोरणा ऊर्फ प्रचंडगड आसपासच्या डोंगररांगातून माना उंच करीत खुणावत असतात. प्रचंडगडाचा

म. शं. सं. डाके, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २६६५ दिनांक २६/११/८३
विषय.......बा. वा. क्र.........

बुधला विशेष ध्यानी येतो. कोकणदिव्याला खेटून गेलेली कावळ्या घाटाची वाट काळनदीच्या काठाकाठाने गेलेली दिसते. आज जरी हा घाट वाहता नसला तरी शिवशाहीत हा नक्कीच वाहता असला पाहिजे. मानगड अन् कुर्डूगड येथून जवळ असले तरी दिसत मात्र नाहीत.

रायगडाच्या इतक्या जवळ पाण्याची टाकी अन् गुहांनी युक्त ठिकाण म्हणजे शिवकाळात नक्कीच पहाऱ्यांचे ठिकाण असले पाहिजे. शिखरमाथ्यावर खांब उभे करायला केलेले खळगेही आहेत. सह्याद्रीची रांग सरळ तुटते ती कोकणात. तेथून अपरांताचे सुरम्य दर्शन घडते. कोकणातून हा माथा उंचावलेला दिवटीसारखा दिसणारा शिखराचा भाग कोकणदिवा या नावाने ओळखला जातो. रायगड जर नंदादीप तर हा कोकणदिवा किती सुंदर आणि यथार्थ!

या कोकणदिव्याला चिकटून एक घाटवाट खाली उतरते. तोच कावळ्याघाट. शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर छत्रपती झालेल्या शंभूराजांना शेखनिजामाने संगमेश्वरी पकडले. बहाद्दूरगडावर सुरू झालेले हाल संपले वढू-तुळजापूरला. याच काळात तक्ताची जागा - रायगड - वेढायला सुरूवात केली इतिकदखानाने शहाबुद्दीनखानाने हा वेढा अधिक आवळण्यासाठी कावळ्या घाटातून फौज उतरवायचा मनसुबा आखला. पण घाटाखालच्या सांदोशी गावचे गोदाजी जगताप अन् सर्कले नाईक यांनी ह्या खिंडीत रण मांडले. खिंड भांडवली. काहीशे शत्रू सैनिक कापून काढले. शहाबुद्दीनखानाने हाय खाल्ली. तो परत फिरला. या संधीचा फायदा घेऊन महाराणी येसूबाईंच्या सल्ल्याने राजाराम महाराज रायगडावरून निसटले. मग प्रतापगड, विशाळगडी अशी शिवाशिवी खेळीत जिंजी गाठली. दरम्यान इतिकदखानाने रायगड कब्जा केला. रायगडाचा इस्लामगड झाला. शंभूपुत्र शिवाजीचा 'शाहू' झाला. काबल्याबावल्याच्या खिंडीत, कोकणदिव्याच्या लगत हा पराक्रम न घडता तर राजाराम महाराजही

औरंगजेबाच्या हाती सापडले असते अन् महाराष्ट्राचाच नव्हे, तर अवघ्या हिंदुस्थानचा इतिहास बदलला असता. हे पुण्यक्षेत्र, हे धारातीर्थ आपण पहायला नको का? त्या ठिकाणची धूळ मस्तकी धारण करायला नको का?

## १३. किल्ले कोतळीगड (पेठ) : (जि. रायगड)

कर्जतपासून ईशान्येस २१ कि.मी. वर आणि नेरळपासून पूर्वेस १८ कि.मी. वर एक निसर्गसंपन्न किल्ला आहे. त्याचे नाव 'कोतळीगड' ! पण पेठ गावच्या निकटतेमुळे त्यास 'पेठचा किल्ला' म्हणूनही ओळखतात. काहीजण त्याचा उल्लेख 'कोथळा' असाही करतात.

कर्जतहून खेड-कडूसकडे जाणाऱ्या कोलिंबा अन् सावळ घाटावर दक्षतेने पहारा करणाऱ्या या किल्ल्याचा उपयोग शिवाजी महाराजांनंतरच्या काळात शस्त्रास्त्रांचा साठा ठेवण्यास करत असत.

राजमाची अन् ढाक किल्ल्यांच्या डोंगररांगांमागे अन् सिंधगड-भीमाशंकरच्या अलीकडे दाट झाडीमधूल आपला उत्तुंग कातळकडा उंचावलेला हा छोटेखानी किल्ला लोभसवाणा वाटतो.

कर्जतहून कोठिंबे किंवा आंबिवली गावी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसने जावे व तेथून ४-४॥ तासांत कोतळीगडाच्या माथ्यावर पोहोचता येते. गडाखालच्या पेठ गावातून या किल्ल्याचा सुळका थेट कर्नाळा किल्ल्यासारखा दिसतो अन् चहू अंगांनी तासल्याप्रमाणे दिसणाऱ्या बुधल्याच्या माथ्यावर आपल्याला कसे जाता येणार हा प्रश्न पडतो. पण पाऊलवाटेने वर चढत गेल्यावर थेट कातळकड्याच्या पोटात खोदलेल्या थंडगार गुहा सामोऱ्या येतात. प्रथम आहे ती देवीची गुहा अन् पाण्याचे

टाके, व त्यानंतर आहे चांगली ऐसपैस अशी भैरोबाची गुहा. या गुहेचे वैशिष्ट्य म्हणजे सपाट, समतल भूमी अन् छताला आधार देणारे कोरीव काम असलेले दणकट स्तंभ.

गुहेत ४-५ ठिकाणी गोल खळगे आहेत अन् काही जुने तोफेचे गोळे आहेत.

या गुहेजवळच किल्ल्याच्या सुळक्यावर जाण्यास एका ऊर्ध्वमुखी भुयारात व्यवस्थित पायऱ्या खोदल्या आहेत. मात्र त्यांची उंची वर जाईपर्यंत आपली दमछाक करते. गडमाथ्यावरील मंद वारा, तेथील शीतल पाण्याचा जलाशय, आजूबाजूच्या रहाळातील हिरवी वनराजी यामुळे आपला थकवा केंव्हाच नाहीसा होतो.

तसं पाहिलं तर हा काही मोठा बलाढ्य दुर्ग नाही की फार महत्त्वाचा किल्लाही नाही. एका बेलाग सुळक्यावरचं हे संरक्षक ठाणं, एक छोटासा गिरीदुर्ग. पण इथंही एक इतिहास घडला आहे. मात्र हे विशेषसा ज्ञात नाही.

मराठ्यांचं इथं शस्त्रागार होतं अन् संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्याला महत्त्वही आलं होतं. माणकोजी पांढऱ्यांनी अब्दुल कादरला व त्याच्या सैन्याला हे आपलेच लोक म्हणून दुर्गात प्रवेश करवून दिला अन् त्यांनी गडावरचं सैन्य कापून काढलं.

हा किल्ला ताब्यात आल्याचे मोठ्या लगबगीने औरंगजेबाकडे कळविले अन् त्याच्या दरवाज्याची सोन्याची किल्ली त्यास भेट म्हणून पाठविली. पण त्या धूर्त बादशहाने असा किल्ला खरोखरच आहे का, म्हणून आतीशखान नावाच्या विश्वासू सेवकाला तेथे पाठविली. अब्दुल कादरला दहा हजार रूपये, शाही फितुरांना अडीच हजार रुपये खात्री पटल्यावर मगच दिले गेले. गडाचे नामकरण झाले, 'मिफ्ताहुलफतह' म्हणजे विजयाची किल्ली पण ते फारसं रूढ झालं नाही आणि आलमगीराला महाराष्ट्रात निर्णायक विजयही कधी मिळालाच नाही.

पुढे नारोजी त्रिंबक या शूरवीराने हा किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न केला तो अयशस्वी झाला. त्यात हा वीर मारला गेला. त्याच्या देहाची इद्दतमामखानाने घोर विटंबना केली. त्यानंतरही पुन्हा एक अयशस्वी प्रयत्न झाल्याची नोंद आढळते. त्यापुढील इतिहास मात्र ज्ञात नाही.

गडमाथ्यावरून भीमाशंकरकडील कलावंतिणीचा महाल, नागफणी, वाघाचा डोळा, सिंधगड, कल्याणकडील हाजीमलंग, चंदेरी, प्रबळगंड, विशाळगड, माणिकगड, माथेरानचे पठार असा विस्तृत मुलुख नजरेच्या टप्प्यात आहे.

'दुर्गमित्र' या संस्थेचे नियमितपणे श्रमशिबिरे भरवून गडाच्या स्वच्छतेच्या उपक्रमांना तेथूनच प्रारंभ केला. या उपक्रमाचे अनुकरण सर्वत्र व्हायला हवे.

## १४. किल्ले कोरीगड ऊर्फ शहागड आणि घनगड : (जि. पुणे)

मुळशीच्या मावळतीकडे अन् लोणावळ्याच्या पूर्वेकडे एक डोंगराळ मावळ भाग आहे. त्याला म्हणतात 'कोरबारसं !' मुळशी, लोणावळा अन् पाली यांच्यापासून सारख्या अंतरावरच्या या मुलखात दोन उपेक्षित, उद्ध्वस्त किल्ले आहेत - कोरीगड अन् घनगड. नितान्तरमणीय असे हे किल्ले दळणवळणाच्या अडचणीमुळे बाजूला पडलेले. दुर्गप्रेमी, साहसी पर्यटक अन् निसर्ग-अभ्यासकांना हवं असणारं बरचं काही देऊ शकणारे हे किल्ले पाहायचे तर दोन-तीन दिवसांची सवड अन् थोडीशी पायपीट करण्याची तयारी ठेवली की पुरे.

मुळशीकडून जलविहाराची मौज घेत जरी या दुर्गद्वयाची

भेट घेता येत असली तरी सोईचे पडते ते लोणावळ्याकडून. लोणावळ्याहून साखर पठाराचे बाजूकडील आय. एन. एस. शिवाजी या नाविक शिक्षण केन्द्राकडच्या रस्त्याने पुढे गेलं की सह्याद्रिच्या माथ्यावरून जाणारा हा रस्ता डावीकडे देश, व उजवीकडे सात-आठशे मीटर खोलीवर असणाऱ्या कोकणचं दर्शन एकाच वेळी घडवतो. घुसळखांब, जपान्यांचं आनंद निकेतन, पेठ शहापूर या वस्त्या मागे टाकून आपण आंबवणे गावी पोहोचतो. गावालगतच दक्षिणोत्तर पसरलेला कोरीगड पाहताच मन विस्मयानं थक्क होतं. सपाट माथ्याच्या या डोंगराला तटबंदीचं शेला-पागोटं बांधणाऱ्यांची दृष्टी नुसतीच स्थपतीची नव्हती, तर ती निसर्गपूजकाचीही होती. मूळच्याच सौंदर्याला खुमारी आणली आहे. काळ्याभोर रेखीव तटबंदीच्या रेषेनं तरण्याबांड जवानाच्या मिशीसारखी.

आंबवणे हे गडाच्या पायथ्याचं गाव ! तशी गडाची पेठ होती नजीकच्या शहापूरला; म्हणूनच याला शहागडही म्हणतात. कागदोपत्रीचं नाव कोरीगड, पण कोराईगड, कुंवारगड हेही नामभेद आहेतच. गडाचा माथा आहे ९२० मीटर उंचीवर

गडावर जायचे मार्ग दोन. उगवतीकडची राजवाट अन् आंबवण्याकडची जरा अवघड वाट. पूर्वेच्या वाटेने जायचे तर घळीतून जावे लागते. अर्ध्या वाटेवर उजव्या हातास एक दुघई गुहा व श्री गणपतीची मूर्ती आहे. त्यानंतर लागतो लढाऊ रचनेचा गणेश दरवाजा. तिथून आत जाताच स्वागत होतं दोन तोफांनी. गडावर एकूण तोफा सहा आहेत. त्यापैकी सर्वात मोठी तोफ 'लक्ष्मी' ती आहे गड देवता श्री कोराईच्या मंदीराजवळ.

गडाची अधिष्ठात्री देवता कोराई प्रसन्नवदनी, चतुर्भुजी, शस्त्रसज्ज आहे. गडावरची देवता अशीच हवी. त्रिशूळ, डमरू, गदा आदी शस्त्रे धारण केलेली ही मूर्ती चांगली दीड मीटर उंचीची आहे. एकेकाळी जडावाचे दागिने घालणाऱ्या मूर्तीला आज ना छत,


ना निवारा. रोजची पूजा व्हावयाची जेथे मारामार, तिथे गंध-फूल-अक्षता यांचं नावच नको.

इ.स. १८१८ जडजवाहिरांनी ही देवता सजलेली होती. ११ मार्च १८१८ रोजी कर्नल प्रॉथर या किल्ल्याचा ताबा घ्यायला आला. सिंहगह, पुरंदर, वज्रगड, लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना, राजमाची, भोरपगड आदी किल्ले जिंकून हा किल्ला खिशात टाकायला निघालेला प्रॉथर इथं चांगलाच चक्रावला. ११, १२, १३ मार्च असे तीन धडका देऊन हे सैन्य हैराण झाले. अखेरीस दि. १४ मार्च १८१८ राजी कोण्या एका गोलंदाजाच्या हाताला यश आले. नेमक्या दारूकोठारावर तोफेचा गोळा पडला. प्रचंड स्फोटानं सारा आसमंत हादरला. गडावर सर्वत्र आगीचे साम्राज्य पसरले. वित्तहानी, प्राणहानी तर झालीच, पण ज्याच्या जीवावर लढायचे ते दारूकोठारच नष्ट झाले अन् गडावरील शिबंदीनं शरणागती पत्करली. त्यापाठोपाठ दक्षिणेच्या आठ मैलांवरचा घनगडही इंग्रजांना मिळाला.

गडाचा ताबा घेतल्यावर या कोराईचे दागिने त्यांच्या दृष्टीस पडले. काय घडले, कसे घडले माहिती नाही, पण हे दागिने मुंबईच्या मुंबादेवीला चढविले गेले आजमितीस मुंबईची मुंबादेवी हे दागिने घालून मिरवित आहे. पण कोरीगडची कोराई मात्र उन्हात तापत आहे, पावसात भिजते आहे.

गडाच्या माथ्यावर आहेत दोन विस्तीर्ण तळी. या दोन्ही तलावांत काळे विंचू, व 'स्पंज' जातीच्या प्राण्याच्या वसाहती आहेत. गडाच्या पश्चिम कड्याच्या उत्तर भागात काही छोटेखानी गुहा आहेत. तेच गणेश टाके. इथंच जवळ एका भग्नावशेषांच्या ढिगाऱ्यात शंख-चक्र-गदा-पद्मधारी श्री विष्णूची मूर्ती आहे.

गडाला चहूबाजूंनी तटबंदी आहे, पण लक्षात राहते दक्षिणेकडील बुरूजाची चिलखती तटबंदी. कोरीगडावरून कर्नाळा, माणिकगड,


कोरीगड-घनगड परिसर, (कच्च्या नकाशा)
लोणावळा
शहापूर
सवघाट
आंबवणे
कोरीगड उर्फ शहागड,
सालतर
तिसकारी.
बापें
भांबुर्डे,
घनगड.
सुधागड उर्फ भोरपगड,
उ,
प्र.के.

प्रबळगड, माथेरान, मोरगड, ढाकचा किल्ला, राजमाची, तिकोना, तोरणा व मुळशीचा जलाशय दिसतो. गडावरील तलावात कमळे आदि शोभीवंत वनस्पती लावून दुर्गयात्रिकांसाठी रात्रीच्या मुक्कामाकरिता एखादी पक्की शेड उभारली तरी पुरेसे आहे.

**घनगड.**

एकेकाळी आर्यावर्ताचं राज्य करणाऱ्या पांडवांवरही अज्ञातवासाची पाळी आली. त्यांनी आपली नांवेही बदलली. पण घनगडाची स्थिती याहूनही वाईट झाली आहे. तिथं एकही मोठी लढाई झाली नाही. त्यामुळे त्याचा फारसा कोठे उल्लेख नाही. किल्लाही लहानुला अन् प्रचलित मार्गांपासून दूर,दुर्गम जागी, त्यामुळेही दुर्लक्षित. चढण्यास अवघड, नकाशातही न दाखविलेला म्हणून ट्रेकर्स व गिर्यारोहक यांनीही अपरिचित. गडाखाली येकोले हे गाव. या दुर्लक्षित दुर्गाच्या वाटेवर एक मंदिर आहे. या जीर्णोद्धारित मंदिरात एक शिलालेख आहे. -

श्री गार
आई माहा
राजाची व की
ले घनगडची

या शिलालेखावरून हे देवी गारजाई व हा किल्ला घनगड आहे हे लक्षात येते. काहीजण घनगडाऐवजी धनगड असा चुकीचा उल्लेख करतात. शिवाय आपलंच बरोबर असा दावा करतात. पण हा शिलालेख केव्हाचा? या उल्लेखलेले महाराज कोण? हे मंदिर केव्हाचे? कोणी बांधले? याचा उलगडा होत नाही. मंदिराजवळ एक भला मोठा तोफगोळा व काही शिल्पे पडलेली आहेत. समोर चौकोनी दीपमाळ आहे. इथून वर गेले की मुख्य डोंगर अन् किल्ल्याची टेकडी यांमधील खिंडीत पोहोचता येते.

खिंडीतल्या कोरीव गुहेत बसलं की पातळावेरी गेलेली दरी, तिथली झाडी अन् भन्नाट वारा आपल्याला क्षुद्रतेची जाणीव करून देतात. तिथून मागे वळून पडक्या महाद्वारातून आत गेले की, माचीवरील खोदीव गुहांची जोडी ध्यानी येते. उजवीकडे एक प्रचंड प्रस्तरखंड किल्ल्यापासून सुटावून बाजूला झाला आहे. पण भिंतीशी पाय उभा करावा तसा तो थबकला आहे. त्याखालच्या कोनाडावजा गुहेत श्री वाघजाईचं ठाणं आहे. थोडे पलीकडे गार पाण्याचे टाके आहे.

खुद्द गडावर जायचा पूर्वीचा रस्ता उभ्या कातळकड्यात खोदलेल्या पायऱ्यांचा असावा. पण त्या कड्यात सुरूंग पेरून वर जायचा रस्ता इंग्रजांनी छिन्नविच्छिन्न केला. तीन-साडेतीन मीटर उंचीचा हा कडा प्रस्तरारोहणाच्या खुब्या वापरून पार केला की महादरवाज्यापेक्षा मोठ्या आकाराच्या दरवाज्यातून गडमाथा गाठता येतो. खिंडीकडच्या बुरूजांची मजबूत बांधणी, दोन-चार घरांचे अवशेष, दक्षिणेकडील माचीवजा खोलगट भागातील सदर अन् टाके इतकेच काय ते येथे आहे.

कातळकड्याशी झटी घेऊन इथं आल्याचं सार्थक होतं ते अपरांताचे दिशेकडे पाहिल्यावर. कुर्डू ऊर्फ विश्रामगड, सुधागड, ऊर्फ भोरपगड, सरसगड, तेलबैल्याचे आवळे-जावळे सुळके डोळ्यांचं पारणं फेडतात.

घनगडावर भाऊसाहेब पेशव्यांचा तोतया सुखनिधान कनोजी ब्राह्मण काही काळ कैदेत होता. याच्याच आगेमागे या घनगडाची किल्लेदारी आम्हा घाणेकरांकडे होती, असा उल्लेख आढळतो.

या दोन्ही किल्ल्यांचा फारसा इतिहास उपलब्ध नाही. पण कोळी सामंतांकडून निजामशाहीकडे, नंतर आदिलशाहीत व मग शिवशाहीत असा या किल्ल्यांचा राजकीय प्रवास आहे. मोगली आक्रमण काळात आंग्रे सरदारांचे ताब्यात हे किल्ले अधूनमधून

असावेत. पण इ.स. १७०० मध्ये पंतसचिवांनी कोरीगड घेतल्याचा उल्लेख आढळतो. पुढे शाहू छत्रपतींच्या सेवेत कुलाबकर आग्र्यांना रुजू करून घेण्यात बाळाजी विश्वनाथांनी मोठं राजकारण साधलं तेव्हा हे दुर्गम दुर्ग पुन्हा सातारकर छत्रपतींच्या ताब्यात आले. पेशवाईत हे कैदखाने बनले. नंतर इंग्रजांच्या ताब्यात जाण्याआधी कोरीगडानं चांगलाच प्रतिकार केला.

८५५ मीटर उंचीचा घनगड अन् ९२० मीटर्स उंचीचा कोरीगड अधिक उंच भासतात ते खालच्या कोकण दर्शनामुळे. जवळचा तेलबैल्या ऊर्फ कावडीचा डोंगर, नाणदांड घाटाची वाट, घुटक्यावरची अवघड वाट, सव्वाष्णीचा घाट, भोरप्याची नाळ इ. कोकणात उतरायच्या अनगड वाटा साहसी मनाला खुणावतात. खाली कोकणातले सुधागड, सरसगड साद घालतात. अन् दुर्गयात्री कोरीगड, घनगड, सुधागड, सरसगड अशी दुर्गयात्रा करून पालीच्या बल्लाळेश्वराचं दर्शन घेऊन अन् उन्हेऱ्याच्या गरम पाण्याच्या कुंडात स्नान करुन तृप्त होतात.

## १५. किल्ले ढाक आणि गडदचा बहिरी : (जि. रायगड)

**आगळावेगळा किल्ला.**

पुण्याहून मुंबईकडे जाताना उजवीकडच्या आवळ्या-जावळ्या राजमाची किल्ल्याच्या पाठीमागून आपला बोटासारखा सुळका उंचावून खुणावणारा हा किल्ला इतिहासाबद्दल मात्र मौन पाळून आहे. हा किल्ला आडवा तिडवा खूपच पसरलेला आहे.

अगदी मोक्यावर असणाऱ्या दुर्गम जागा तटबंदीने बळकट करुन आत पाणी व अन्नाची वर्षभराची व्यवस्था केल्यास शत्रूपासून

व्यापारी मार्गांचे उत्तम संरक्षण करू शकतात. शिवशाहीत असे असंख्य छोटे छोटे किल्ले बांधले गेले किंवा त्यांची डागडुजी केली. विस्तार हे यांचे वैशिष्ट्य नसून दुर्गमता व मोक्याची भौगोलिक स्थिती हेच यांचे महत्त्व होते.

लोणावळ्याला उतरून तुंगार्ली धरणाजवळून वळवंडे गावावरुन जाणारी एक वाट आपणास या अपरिचित दुर्गाची भेट घडवते. कर्जतहून गौरकामत गावावरून भिवगड डावीकडे ठेवून अती कंटाळवाण्या वाटचालीनंतर ढाका गावाच्या शिवारातून अस्ताव्यस्त पसरलेले पठार तुडविल्यावर या लाजऱ्याबुजऱ्या मानकऱ्याचे नाकासमोर ठेवून ढोरवाटांनी हा किल्ला जवळ करता येतो.

या किल्ल्याच्या विस्तृत पठारावर थोडकीशी तटबंदी आणि एकाच ठिकाणी असलेली ५-६ टाकी याखेरीज किल्लेपणाची आणखी खूण दिसत नाही. मांजसुब्याच्या नाकाडाला खेटून असलेली राजमाची किल्ल्याची दुक्कल, त्यामागून डोकावणारे नागफणीचे टोक, शहागड, माणिकगड, कर्नाळा, विशाळगड, प्रबळगड, माथेरान, भीमाशंकरचे पठार, सिद्धगड असा सभोवारचा विस्तृत प्रदेश येथून स्पष्ट निरखता येतो. पूर्वीचा बोरघाट आणि सध्याचा रेलमार्ग हे येथून जवळच आहेत.

**गडदचा बहिरी.**

किल्ल्यापेक्षा त्याच्या पोटात असलेला बहिरी आसपासच्या ठाकरांना जास्त परिचित आहे. एका उभ्या तुटलेल्या कड्यावरील गुहेत हा भैरोबा रागावून जाऊन बसलेला आहे. या प्रसिद्धीपराङ्मुख बहिरोबाची शहरी पर्यटकांना ओळख करुन देण्याचे श्रेय मात्र माननीय साहित्यिक श्री. गो. नी. तथा अप्पासाहेब दांडेकरांकडेच जाते. या गुहेतल्या बहिरीला 'गडदचा बहिरी' म्हणूनच सर्वजण ओळखतात. (गडद म्हणजे गुहा.) ढाकच्या किल्ल्याकडे बघितल्यास

दोन सुळके नजरेत भरतात. त्यातील वरच्या सुळक्याच्या पायथ्याचे रेषेत एकेकाळी आडवी गुहा दिसते, तेच बहिरीचे निवासस्थान.

**साहसी वाटचाल.**

साहसाला खरी सुरूवात होते ती एका चिंचोळ्या खिंडीतून. ढाकचा किल्ला आणि त्याला खेटून असलेला सुळका यांच्यामध्ये काटकुळा माणूस जेमतेम मावेल इतकी अरुंद पण ८-१० मी. लांब अशी खिंड आहे. दोन्ही बाजूला अगदी उभे असे प्रस्तर, खाली मुरुमाचा घसारा आणि खिंडीतून दिसणारी हात-दीड हात रुंदीची आकाशपट्टी. येथे उभे राहिल्यावर ही वाट आपणास कोठे नेणार आहे. याबद्दल थोडीशी भीती निर्माण होते आणि खिंड पार केल्यावर सामोरा येतो तो प्रचंड कडा. वरच्या बाजूस सरळ कडा आणि डावीकडे खालच्या बाजूस पाताळाचे दर्शन घडविणारा, गवताचे पातेही न उगवू देणारा शुद्ध पाषाणाचा खोल कडा. अगदी पाऊल मावेल इतकी अरुंद अशी पावठ्यांची मालिका दिसते. खाली बघितल्यास डोळे फिरतात, वर बघितल्यास आधार सापडत नाही अशा कसरती वाटेवरून ५०-६० मी. वर गेल्यावर उभ्या कड्यात खोबणी खोदलेल्या आढळतात. ८-२० मीटर उभे अंतर पार केल्यावर लागते एक जुने काळे कुळकुळीत खोड. एका खळग्यात पुरलेले हे खोड हात लावताच हलते. पण त्याचाच आधार देऊन वर जावयाचे असते. ७-८ मी. वर आहे कुंभाळ्याचा वेल. हा देखील ८-१० मी.उंच. या लपालपा वाकणाऱ्या खोडाच्या आधाराने अन् कुंभाळ्याच्या वेलावरून वर आल्यावर दर्शन होते ते बहिरीचे. त्या आधी थोडेसे रचाई काम आहे.

बहिरी म्हणजे आपला ठाकरांचा अनगड देव. ना मूर्ती ना शिल्पकाम. एका भल्या थोरल्या दगडांच्या समूहाला शेंदूर

फासला आहे. शेजारी नवस फेडण्यासाठी वाहिलेले त्रिशूळ आहेत. क्वचित नारळाची करवंटीदेखील आढळते.

ही गुहा चांगली १२-१५ मीटर लांब, ६-७ मीटर खोल अन् ३-४ मी. उंच आहे. या नैसर्गिक गुहेमध्येच दोन दगडी टाकी कोरलेली आहेत. या गुहेशेजारी एक कोरीव मानवनिर्मित गुहा आहे, तेथेच बहिरीला प्रसाद दाखविण्यासाठी अन्नब्रह्म साकार होते. लहानुल्या कोकरांच्या रक्तामांसातून !

हा बहिरी फार रागीट आहे. बाईमाणसांचा वाराही त्याला चालत नाही म्हणे ! विटाळचांडाळ कालविणाऱ्यास तो समोरच्या पातळस्पर्शी दरीत ढकलून देतो म्हणे ! (अर्थात त्यात काही अर्थ नाही, हे आता अनुभवाने सर्वांना कळलं आहे.)

बहिरीच्या गुहेतील टाक्यात स्वयंपाकाची भांडी आहेत. सर्व भांडी वजनदार आणि तांब्या-पितळेची आहेत. ताटे, वाट्या, लोट्या, पराती, पातेली, थाळ्या सर्व काही आहे. पण हे चोरून नेल्यास बहिरी त्याला समोरच्या दरीत ढकलून देतो. अशी भावना आहे. म्हणून आज वर्षानुवर्षे ही भांडी तेथेच आहेत व तशीच राहतील. पाहिजेत त्याने वापरावीत. वापरून झाल्यावर स्वच्छ करून परत टाक्यात ठेवून द्यावीत अशी पद्धत !

ढाकच्या किल्ल्यावर जाऊन गडदच्या बहिरीचे दर्शन घेऊन परत आल्यावर असते एका साहसाची अनुभूती अन् प्रचंड निसर्गातल्या एका रौद्र देवतेचे दर्शन घेऊन तशाच स्थानी जाऊन सुखरूप परतल्याचे समाधान !

## १६. किल्ले बहादूरगड : (जि. नगर)

भीमातटाकी, पेडगावी एक शहाणा राहत होता, त्याचं नाव

खानजहान बहादूर कोकलताश जाफरजंग. हिंदवी स्वराज्याचं मूळ असणाऱ्या शिवरायांचा समूळ बीमोड करण्याचं काम त्याच्यावर सोपवलं होतं. बादशहा औरंगजेबाचा हा दूधभाऊ. आलमगिराच्या या सेनापतीनं इथं एक भुईकोट किल्ला उभारला आणि त्याला स्वतःचं नाव दिलं बहादूरगड ! या मोगली सरदाराचा शिवाजी महाराजांनी दोनदा 'मामा' केल्याची नोंद ग्रंथांतरी आढळते.

१६७४ चा सुमार. नुकताच शिवरायांना राज्याभिषेक झाला होता. त्यासाठी अमाप धन खर्ची पडले होते. ते पैसे खजिन्यात जमविणे अनिवार्य होते. याच सुमारास एक कोटीचा खजिना आणि दोनशे जातिवंत अरबी घोडे बहादूरगडात डेरेदाखल झाल्याची महत्त्वाची बातमी शिवछत्रपतींना कळली मात्र, त्यांनी ती संधी साधण्याचं ठरवलं. नऊ हजार घोडदळाची त्यासाठी निवड केली. त्यातल्या दोन हजारांच्या टोळीनं गडावर हल्ला केला. शूरवीर बहादूरखानानं मोठ्या शर्थीनं प्रतिकार केला. मराठी सैन्य मागे हटू लागले. बहादूरखानाच्या डोक्यात विजय शिरू लागला. ससैन्य बाहेर पडलेला बहादूरखान मराठी सैन्याला चेपू लागला. पळणारे मराठे पाहून त्यांचा पाठलाग सुरू झाला आणि इथेच मोठी घोडचूक झाली. पळणाऱ्या मराठ्यांनी हूल देत देत गडापासून खूप दूर हे सैन्य नेले.

आता गडात उरले बाजारबुणगे-आचारी-पाणके आणि बायका-मुले. मराठ्यांच्या उरलेल्या सात हजारांच्या घोडदळाने दुसरा हल्ला चढवला. तो अतिशय प्रखर होता. मराठ्यांनी किल्ल्यात प्रवेश केला. अवघा किल्ला लुटून-पुसून साफ केला. दोनशे घोडे आणि एक कोटीची लूट त्यांना मिळाली. बहादूरखानाने केलेली तजवीज कामी आली. पेडगावचा शहाणा परत आल्यावर हात चोळीत अन् दाढी उपटत बसला.

आता शिवरायांना दक्षिण दिग्विजयासाठी कर्नाटकप्रांती जायचं

होतं, पण तेवढ्यात औरंगजेबाने बहादूरखानाला प्रचंड फौजफाटा अन् रसद गोळा करुन निर्णायक टोला हाणण्याच्या दृष्टीने योजना आखण्याचा आदेश दिला. दूर दक्षिणेत असताना ही आघाडी थंड राहणं शिवछत्रपतींना हवं होत. 'शक्तीने मिळती राज्ये, युक्तीने कार्य होतसे' हे तर त्यांना चांगलेच माहिती होते.

संपूर्ण शरणागती, बिनशर्त शरणागतीची बोलणी करण्यासाठी त्यांनी बहादूरखानाकडे याचना केली. बहादूरखानाने अनुकूलता दर्शविली. स्वराज्याचे सारे किल्ले बादशाही अमलाखाली येणार होते. अभिषिक्त राजा शरण येणार होता. स्वराज्याचं रोपटं दिल्लीच्या दारात लावलं जाणार होतं. फक्त एक बारीकशी अट होती. या तहनाम्यावर खाशा आलमगिराची संमतिदर्शक पंजाची मुद्रा अंकित व्हावी, एवढीच इच्छा होती. या मामुली अटीलाही मान्यता मिळाली. बोलणी सुरू झाली. वाटाघाटीचे गुऱ्हाळ लांबतच गेले. शेवटी कागदपत्रे तयार झाली. औरंगजेबाकडे रवाना झाली. आग्र्याच्या सुटकेचे प्रकरण झोंबूनही बादशहाने हे प्रकरण हाताळले. मराठी राज्य बिनबोभाट दिल्लीच्या दावणीला बांधणीला बांधणाऱ्या बहादूरखानाला एक हत्ती भेट मिळाला. संमत्तीपत्रावर खाशांची सही - पंजामुद्रा मिळाली. शाही रुबाबात ते फर्मान पेडगावच्या बहादूरगडावर दाखल झाले. आता फक्त कार्यवाही राहिली होती. रायगडच्या राजाला ही गोड बातमी शाही दिमाखात कळविण्यास वकील पाठवला गेला. आपल्या बढतीची दिवास्वप्नं पाहणाऱ्या बहादूरखानावर वीज कोसळली. धरणी दुभंगून पोटात घेईल तर बरे अशी परिस्थिती झाली. हा तह शिवछत्रपतींनी चक्क धुडकावून टाकला वकील जीवानिशी परतला इतकेच. महाराजांचे राजकारण तडीस गेले होते. दक्षिण दिग्विजय सुकर होण्यासाठी आवश्यक म्हणून हा खोटा बनाव होता. त्याला बहादूरखान व औरंगजेब दोघेही बळी पडले. या भूलथापा आहेत हे त्यांना फार उशिरा

कळले. बहादूरखान 'मामा' साहेब, पेडगावची कीर्ती दिगंत करते झाले.

अशा या बहादूरगडाने पुढे मात्र एक करूणास्पद प्रसंग पाहिला. महाराष्ट्राचा दुसरा छत्रपती शेख निजामाने संगमेश्वरी पकडला ही वार्ता कळताच अकलूजला असलेला आलमगीर, बहादूरगडावर आला. तेथे त्याने संभाजीची कैफियत ऐकली. संभाजी अन् कलुषा यांना वाकडी टोपी घालून त्यांनी धिंड काढीत आणले होते. विदुषकी पोशाखात महाराष्ट्राचा दिमाखदार राजा पाहून बादशहाने सिज्दा केला. आपल्या शाही आसनावरून उठून तो खाली आला व गुडघे टेकून अल्लाचे आभार मानण्यास तो बसला. तेव्हा तो म्हणाला,'कुणाचे नशीब काळे असेल तर जमजम (पवित्र विहीर) आणि कौसर (स्वर्गीचे सरोवर) यांच्या पाण्याने ते धुऊनही काही उपयोग होणार नाही. ते उजळणार नाही.' पण या कृतीचा अर्थ कवी कलशाने संभाजीला सांगितला तो असा की,'शंभूछत्रपतींना पाहून खासा दिल्लीद्रही सिंहासनावरून उठून खाली आला आहे.' मृत्यूच्या ओठावर असताना असा उपमर्द, अशी टवाळी करणं केवढं धाडसाचं काम. याची शिक्षा म्हणून डोळ्यांत सळई फिरवून ते काढण्याची, वळवळती जीभ छाटण्याची अन् डाग देऊन चामडी सोलून काढण्याची शिक्षा शंभूछत्रपतींना मिळाली. पुढे वढू-तुळापूरला त्यांना मृत्यू आला.

अशा या इतिहासाविख्यात किल्ल्यावर जाणं मोठं गैरसोयीचं आहे. सिद्धटेक या गणेशक्षेत्री जाणाऱ्या गाडीनं पेडगाव फाट्यावर उतरावं किंवा पुणे-करमाळा गाडीनं पेडगाव गाठावं. पण या सगळ्यात यातायातही फार. दौंडपासून जवळ असूनही इथं जाणं गैरसोयीचं आहे.

किल्ल्यात काही उत्तम कोरीव कामाची मंदिरे, भग्न अवशेष, भव्य प्रवेशद्वारे, तटाजवळ हत्ती मोट असं बरंच काही आहे.

भीमा-सरस्वतीच्या संगमावरचा हा प्रेक्षणीय किल्ला दुर्लक्षित राहिला आहे एवढे खास.

## १७. किल्ले लोहगड : (जि. पुणे)

बुलंद, बेलाग नि बळकट किल्ले लोहगड !

शिवछत्रपतींनी निर्मिलेल्या स्वराज्याचा एक पोलादी आधारस्तंभ! ऐन मावळात असला तरी पुणे-मुंबई हमरस्त्यावर आणि लोहमार्गाचे जवळ. परंतु पर्यटकांचे दृष्टीने कठीणच. फारतर कार्ला, भाजे किंवा अतीच झालं तर बेडसा यांना भेट देणारे प्रवासी मोठ्या अचंब्याने लोहगड-विसापूरच्या बुलंद अशा जोडगोळीकडे निरखून पाहतात आणि तिथेच त्यांचे गिरिदुर्गाचे कवतिक संपते. पुण्याहून मुंबईकडे जाताना मळवलीच्या बाजूस डाव्या हाताशी लोहगड-विसापूर हे आवळे-जावळे दुर्ग वसले आहेत. पैकी लोहगडाचा माथा आहे सुमारे ४ कि.मी. चालीवर.

फार फार प्राचीन काळापासून सिंधुसागराच्या तटावर बसलेली अन् वाढलेली कल्याण-सोपारा आदी बंदरे. पण त्यांचा व्यापार टिकवून धरला होता तो देशावरील संपन्न बाजारपेठांनी. त्यांनी साधणारे दुवे होते नाणेघाट व बोरघाट. जीवधन व भैरवगड हे नाणेघाटाची राखण करीत होते. तर राजमाची अन् लोहगड हे बुलंद पहारेकरी हीच कामगिरी इमानेइतबारे पार पाडीत होते बोरघाटात.

लोहगडाच्या डोंगरात आहेत भाजे व बेडसा येथील लेणी. हीनयान बौद्धांची भाजे येथील लेणी मोठी देखणी आहेत. थेट इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकातली - सातवाहन राजांच्या काळातील. या बौद्ध लेण्यांशेजारीच एका जलप्रपाताजवळ एक सूर्यगुंफा आहे.

ऐरावतावर आरूढ झालेला इंद्र आणि सातवाहनांना विशेष पूज्य असणारा भगवान सूर्यनारायण आपल्या संज्ञा व छाया या पत्नींबरोबर चार घोड्यांच्या द्विचक्री रथात आरूढ झालेला. या मूर्ती हेच सूर्यगुंफेचे वैशिष्ट्य.

अशा इतक्या प्राचीन लेण्यांचा बौद्ध भिक्षू प्रवासातील टप्पे म्हणून उपयोग करीत. अर्थात ही लेणी बलदंड शासनाचे मदतीशिवाय उभारली जाणे कठीणच. म्हणजे लोहगड हे लष्करी ठाणे त्याहूनही प्राचीन असले पाहिजे. हा दोन-सव्वादोन हजार वर्षांचा पुराणपुरुष आपल्या इतक्या जवळ आहे याची कल्पना क्वचितच कोणाला येते. बौद्धधर्मीय प्रजा आणि वैदिक पंथानुयायी राजा असणारा समाज याच रहाळात मोठ्या सुखाने रहात होता, परंतु या ठिकाणीही एक क्रौर्य घडले आहे. शेख अमर, हाजी मलंग आणि शेख सल्ला अरबस्तानातून दर्यापार होऊन हिंदूस्थानात आले. शेख सल्ल्याने मुक्काम ठोकला मौंजे पुणे. शनिवारवाड्याजवळील पुण्येश्वर केदार अन् नारायण ह्या प्राचीन देवतांना हुसकावून लावले. त्यांचीच पुढे पुरंदरावर स्थापना झाली आणि गरीब बिचाऱ्या हिंदूंनी त्या ठिकाणी शेख सल्ल्याची स्थापना झाल्याचे निमूटपणे आजतागायत मान्यही केले. बाबा हाजी मलंग कल्याणजवळील मलंगगडाच्या माचीवर रहावयास गेले. आज तो गड त्यांच्याच नावाने ओळखला जातो. तर हा शेख आपल्या मुंजावरासह लोमश ऋषींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या लोहगडावर मुक्कामास आला. तेथे एक साधू तप करीत होता. त्याला तेथून तटाखाली फेकून दिले आणि आयत्या बिळावर हे नागोबा आरूढ झाले अर्थात आजही गायमुख खिंडीच्या बाजूस ह्या साधूची समाधी आहे व त्याची 'वनदेव' म्हणून पूजाही होते. अशी आहे आपली सोशिक वृत्ती. हा शेख अमर व त्याचा मुजावर यांची कबर व थडगे अद्यापही गडावर विद्यमान आहेत.

पुण्याहून लोणावळा लोकलने मळवलीस उतरावे व भाजेगावातून जाणाऱ्या रस्त्याने भाजे लेणी जवळ करावीत. तेथून लोहगडाचे सुरम्य दर्शन घडते. गायमुख खिंडीची दिशा पकडून चालत रहावे किंवा लोहगडाच्या पायथ्यापायथ्याने टेकड्यांमागून टेकड्या ओलांडीत गायमुख खिंडीकडे यावे. दोन्ही वेळी आपण रस्ता चालत असतो तेव्हा वाटते, आपण विसापूरकडेच जात आहोत. कोलंबस निघाला भारताकडे पण त्याला सापडली मात्र अमेरिका, अगदी तसेच इथे होते. अगदी खिंडीपर्यंत आपण जात असतो विसापूरकडे आणि पोहोचतो मात्र लोहगडावर.

गडाच्या ऐन पायथ्याशी आहे केंबळी घरांचे छोटेखानी गाव मौजे लोहगड ऊर्फ लोहगडवाडी. गडावर प्रवेश करावा लागतो पाठोपाठच्या चार दरवाज्यांतून आणि तोही सर्पाकार मार्गावर उभारून अधिक मजबूत केलेला. पहिल्या दरवाजाचे नाव आहे गणेश दरवाजा. त्याच्याच डाव्या-उजव्या बुरूजाखाली कुठेतरी सावळे नावाच्या जोडप्याचा नरबळी दिला आहे. पुरंदरावरही शेंदऱ्या बुरूजाबाबत अशीच हकीगत ऐकू येते. या गणेश दरवाजावरील गणपती जरी तुम्हा आम्हाला विघ्नहर्ता वाटत असला तरी त्या जोडप्याला तो विघ्नकर्ताच वाटला असेल. अर्थात त्याच्या बदल्यात त्यांच्या वंशजांना लोहगावची पाटिलकी दिली गेली. त्यानंतर आहेत नारायण आणि हनुमान दरवाजे. पैकी हनुमान दरवाजा हा मूळचा. सर्वांत प्राचीन, बाकीचे नाना फडणीसांनी बांधलेले. या दोन दरवाज्यांमध्ये दोन भुयारे आहेत. एकात भात आणि दुसऱ्यात नाचणी साठवून ठेवीत. भाताचे कोठार आहे पाच मीटर लांब, चार मीटर रुंद अन् तीन मीटर उंच. तर नाचणीचे आहे, दहा मीटर लांब, दहा मीटर रुंद, चार मीटर उंच. शेवटचा दरवाजा महादरवाजा या नावाने ओळखला जातो.

पैकी गणेशदरवाज्यावरील पट्टीवर एक महत्त्वपूर्ण शिलालेख

आढळून येतो तो येणेप्रमाणे :

श्री गणेशायनमः गणेश दरवाजा बांधला बा-
ळाजी जनार्दन फडणीस बीद्यमान धों
डो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके १७१२
साधारण नाम संवत्सरे अस्वीन शु-
ध ९ नवमी रवीवार समाप्त शके-
१७१६ आनंदनाम संवत्स-
रे जेष्ठ सुध त्रयोदसी बु-
ध वार कता (र्त) व्य जयाजी
धनराम गवडी त्रिव-
कजी सुतार

म्हणजेच या दरवाजाचे काम नाना फडणीसाने १ नोव्हेंबर १७९० ते ११ जून १७९४ या कालावधीत केले आहे.

महादरवाज्यातून आत येताच एक मशिदवजा इमारत आहे आणि त्यातील थडगे हे औरंगजेबाच्या मुलीचे आहे असे सांगण्यात येते. मात्र तिचे नाव, गाव, जन्म, माता इ. बद्दलची माहिती मिळत नाही. याच इमारतीशेजारी सदर व लोहारखान्याचे भग्नावशेष आढळतात.

या मशिदीशेजारीच एक टेकडीवजा उंचवट्याचा भाग आहे तेथे मोठी सदर आहे व एक खाली आणि एक वर अशा कोठ्या आहेत. एकीला खजिनदाराची कोठी म्हणून ओळखतात. ती आहे एकवीस मीटर लांब अन् पंधरा मीटर रुंद. दुसरी ओळंबलेल्या खडकाखाली असून तिला लक्ष्मीकोठी असे म्हणतात. लोमश ऋषींचा निवास येथेच होता असे मानतात. पूर्वी या तळ्याच्या काठावर एक शिलालेख होता. त्यात लिहिल्याप्रमाणे हे तळे इ.स. १७८९ मध्ये नाना फडणीसाने बांधले असा उल्लेख होता. आजमितीस हा शिलालेख दृष्टीस पडत नाही. इंग्रजांच्या

ताब्यात आला तेव्हा नानांचा खजिना त्यांनी या तळ्यात ठेवला असावा अशी शंका येऊन कड्याकडून त्यातील पाण्याला मोकळी वाट करून दिली व ते तळे रिते झाले. आजही त्यात फारसे पाणी साचून रहात नाही. तो खजिना त्यांना मिळाला की नाही कोण जाणे पण हा तलाव मात्र रिकामाच राहिला आहे. जवळच त्रिंबकेश्वर महादेवाचे छोटेसे मंदिर आहे.

याच्या पश्चिमेस आहे विंचूकाटा. पंधराशे मीटर लांब अन् तीस मीटर रुंद अशी ही डोंगराची सोंड निसर्गाच्या लहरीने निर्माण झालेली एक दगडी भिंतच आहे. अर्थात मूळ डोंगरापेक्षा किंचित खालच्या पातळीवर. तेव्हा तेथे जावयाचे म्हणजे एक टप्पा उतरून पलीकडे जावे लागते. गडावरून पाहिले असता हा भाग विंचवाच्या नांगीसारखा दिसतो म्हणून विंचूकाटा. गडाच्या या भागावर देखील चवदार पाण्याची उत्तम सोय केलेली आढळतेच. गडाच्या घेऱ्यावर लक्ष ठेवण्यास आणि आणीबाणीच्या प्रसंगी रक्षण करण्यास ही नांगीच उपयोगी पडावयाची. नैऋत्येकडे आहे उंबरखंड.

शाहिस्तेखानाचा प्रबळ सरदार कारतलबखान, अमरसिंह, उदारामाची शूर पत्नी 'रायबागन' आपापल्या सैन्यासह शिवराज्यातील निसर्गरम्य कोकणाचा लचका तोडायला निघाले होते. शिवरायांनी यातला धोका ओळखला आणि या मोहिमेचा उंबरखंडात गाठून विचका केला. यातून शिवरायांची आक्रमक लष्करी वृत्तीची साक्ष पटते. अन् हिंदुस्थानभर राज्य करण्याची इच्छा बाळगणाऱ्या दिल्लींद्राच्या अविचारी सेनापतींची कीव करावीशी वाटते. असो.

इ.स. १६६४. मोगल बादशाहीची शान असणारी सुरत लुटून मिळवलेली संपत्ती नेताजींच्या नेतृत्वाखाली लोहगडावर पाठवली अन् स्वत: राजगडावर अगदी घाईघाईने निघून गेले. त्याला कारणही तसचं होत ! शहाजी महाराजांचा अपघाती मृत्यू झाला होता आणि शिवरायांच्या परमप्रिय व पूज्य अशा मासाहेबांचा

कुंकुमतिलक पुसला गेला होता. आता त्या सती जाऊ इच्छित होत्या आणि ते थांबवणं अगत्याचं होतं. या स्वराज्याच्या निर्मात्याला कुठेतरी सावली हवी होती. कुणीतरी कौतुक करणारं हवं होतं आणि ते करणारं एकच माणूस होतं आईसाहेब ! वीरमाता जिजाबाई ! आपण ज्या मार्गाने वर आलो त्याच मार्गाने ही कोट्यवधी रुपयांची धनसंपदा वर चढली होती. त्यातली पै न पै स्वराज्याची उभारणी करण्यात खर्ची झाली होती. आज ह्या गडावर सर्वत्र पडले आहेत गायीगुरांच्या शेणाचे पो अन् पर्यटकांनी खाऊन संपवलेल्या चिवड्याच्या रिकाम्या पिशव्या. जिथे या धसंपदेचे रक्षण करायला चिरेबंदी बांधकामं होती तिथे आज माना टाकलेल्या कमानी, ढासळलेले बुरुज तटांच्या भिंती अन् ओहोरलेली व शेवाळलेली पाण्याची टाकी.

ज्या दिवशी पोटात संहारक बॉंब घेऊन पहिले विमान आकाशात झेपावलं त्याच क्षणी या गिरिदुर्गांचं महत्त्व जरी संपलं असलं तरी या ठिकाणावरील स्फूर्तिदायक इतिहास सांगणारे फलक तेथील वास्तूंच्या अवशेषांजवळ लावून, पद्धतशीर झाडी वाढवून तेथे भारतीय पर्यटकांना खासच वळवून घेता येईल. नव्हे, पर्यटन खात्याचं ते आवश्यक कर्तव्य असलं पाहिजे.

लोहगड अन् विसापूर या किल्ल्यांमधील खिंडीला गायमुख खिंड म्हणतात. हे वर सांगितले आहेच. तेथून लोहगडाकडे येताना दोन गोष्टी दिसतात त्या आवर्जून पहाव्यात. पहिली म्हणजे 'कापला' या खिंडीजवळच रस्त्याचे सुरुवातीस घोडे, उंच, हत्ती इ. अशी नऊ चित्रे असलेला एक ओटा आहे. त्याला पांढरा चुना लावलेला असून त्याच्यापुढे हनुमानाची मूर्ती आहे. हे ठिकाण म्हणजे कापला.

या खिंडीबाबत तशी एक गोष्ट सांगतात की, कोणा एका काळी कोणा एका बादशहाने लोहगडाला असणारे भले थोरले

छिद्र (जे आगगाडीने जातानाही व्यवस्थित दिसते) आणि विसापूरची तटबंदी यांना एक अखंड दोर बांधला आणि त्यावरून चालत जाणाऱ्याला अर्धे राज्य बक्षीस देऊ केले. कोणा एका अज्ञात माणासाने ही शर्त पुरी करत आणली देखील, पण त्या बादशहाने त्याचा घात केला. तो जेथे पडून मेला तेथे एक टाळदेव - शेंदूर फासलेला धोंडा बसविला गेला आणि जाणारा-येणारा प्रत्येकजण झाडाचा एक टहाळा तोडून त्यावर टाकतो म्हणून टहाळदेव-टाळदेव अशी ही कहाणी एका स्थळीय देयाची.

ऐतिहासिक साधनांच्या अभावी ह्या प्राचीन दुर्गाचा सलग इतिहास ज्ञात नाही. परंतु हे बलदंड स्थान सातवाहन कालात *अस्तित्वात होते याबद्दल* शंका नाही. पुढे बहमनी राजांचा अंमल या प्रदेशावर होता. बहमनी राज्याचे तुकडे झाल्यावर इ.स. १४९१ मध्ये निजामशाहीचा डोलारा कोसळल्यावर लोहगडाचा ताबा इ.स. १६३७ मध्ये आदिलशाहीकडे गेला. इ.स. १६४८ च्या आसपास शिवाजी महाराजांनी कल्याणची लूट केली आणि त्या धामधुमीतच तुंग ऊर्फ कठीणगड, तिकोना ऊर्फ वितंडगड, श्रीवर्धन आणि मनरंजन हे राजमाचीचे जुळे किल्ले, लोहगड या दुर्गम दुर्गाचाही ताबा घेतला. त्यातच पुढे तळे, घोसाळे हे रायगडाजवळचे छोटेखानी किल्ले त्यांच्या ताब्यात आले. पुढे केवळ राजकीय तडजोड म्हणून मिर्झाराजे जयसिंगाशी केलेल्या तहात जे २३ किल्ले शिवाजीराजांनी मोगलांच्या हवाली केले त्यात हा एक होता. परंतु अवघ्या पाच वर्षात म्हणजे इ.स. १६७० मध्ये त्यांनी हा पुन्हा जिंकून घेतला. शिवरायांच्या मृत्यूनंतरच्या आलमगिरी वावटळीत हा परत मोगलांकडे गेला. इ.स. १७१३ च्या सुमारास सरखेल कोन्होजी आंग्रे यांनी तो पुन्हा स्वराज्यात आणला. परंतु पुढे आंग्रे छत्रपतींना जुमानीत नाहीसे झाले, म्हणून शाहूंचे प्रधान बहिरोपंत पिंगळे आंग्र्यांकडे गेले तेव्हा त्यांना पराभव पत्करावा लागून बंदिवास

घडला. परंतु कर्तबगार पेशवा बाळाजी विश्वानाथ भट याने कान्होजीची समजूत घालून राजमाचीखेरीज सर्व किल्ले आणि निष्ठा आंग्र्यांकडून शाहूछत्रपतींच्या पायी वाहण्याची कठीण कामगिरी पार पाडून दाखविली. ही घटना इ.स. १७२० च्या सुमारास घडली.

थोरले माधवराव निजामावर स्वारी करण्यास गेले असता निजामाने पुण्यावर हल्ला चढविला. त्यावेळी पुण्यातील प्रचंड संपत्ती लोहगडावर ठेवली गेली. परंतु घर फिरले की वासेही फिरतात या न्यायाने येथील संपत्ती (अंदाजे २० लक्ष रुपये) निजामाने लुटून फस्त केली. पुढे जावजी बोंबले याच्या मदतीने नाना फडणीसाने आपली पकड या किल्ल्यावर बसविली. त्यांनी निजसुरे यांची नियुक्ती येथे केली. नानांच्या मृत्यूनंतर त्यांची नववी पत्नी जिऊबाई ही येथेच होती. दुसरा बाजीराव व निजसुरे यांच्या भांडणात जनरल वेलस्लीने हस्तक्षेप केला. त्यातच जिऊबाई मेणवली येथे जाऊन राहिली. १८१८ च्या अखेरच्या इंग्रज-मराठे युद्धात ४ मार्च रोजी विसापूर जिंकून घेतला आणि एकही गोळी न झाडता लगेचच लोहगडही कर्नल प्रॉथरच्या ताब्यात आला.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र 2(६५ दिनांक 26/11/03
विषय 611.41 क्र.......

BVBK-0402865